MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष एकोणिसावे / अंक ६ / जून २०१८

## संपादकीय

## पुन्हा मेकॉले

जून महिना हा शाळा सुरू होण्याचा महिना. सगळ्या सुट्ट्या संपून अगदी बालवाडीपासून ते महाविद्यालयापर्यंतचे विद्यार्थी जूनमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात करतात. हाच महिना पावसाचाही. दाहक उन्हाळा संपून सुरुवातीच्या पावसाच्या सरी मृद्गंधाबरोबर हवाहवासा वाटणारा गारवाही आणतात. सध्या आपण जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सगळ्या दिवसांचे समारंभ करुन ठेवले आहेत. आता शाळेचा पहिला दिवस त्यातन कसा सुटेल? पुस्तकाच्या आशयापेक्षा वेष्टनाला महत्त्व जास्त आले आहे.

पुस्तक, शाळा आणि गुरुजी यांच्याबद्दल आदर आणि भावना, त्यांचे पावित्र्य, ही एका दिवसाची घटना नसून कायमस्वरूपी जतन करण्याची गोष्ट आहे. त्याकरता तशी सामाजिक, सांस्कृतिक मानसिकता निर्माण करायला लागते. असा आदर हा करमणूक किंवा समारंभातून निर्माण होत नसतो. आपल्या परंपरेतील गुरुचे किंवा सरस्वतीचे महत्त्व हे असेच अनेक माध्यमांतून संस्कारीत माणूस घडवण्याचा प्रयत्न होता. कुठल्याही समारंभापेक्षा तो एक संस्कार होता.

यात आपण बदल कसा केला याचा इतिहास बघणे हे उपयुक्त ठरेल.

समाजव्यवस्थेचे अनेक घटक असतात. शिक्षण हा त्यातलाच एक घटक. एकंदरीत सामाजिक प्रकृतीपेक्षा या घटकाची परिस्थिती ही वेगळी असू शकत नाही. 'प्रथम' या स्वयंसेवी संस्थेनी आजच्या आपल्या शिक्षणावर प्रकाशित केलेले निष्कर्ष हे गेले काही वर्ष सातत्याने तसेच आहेत. आठवीतल्या मुलाला पाचवीचे पुस्तक नीट वाचता येत नाही, गुणाकार भागाकाराचा पत्ता नाही.

नुकतीच महाराष्ट्र टाईम्समध्ये बातमी आली होती की, कोल्हापूरच्या जिल्हापरिषदेच्या ८४ शाळांत एकही शिक्षक नाही. अनेक जिल्ह्यांमध्ये हीच परिस्थिती असेल. जे शिक्षक आहेत त्यांच्या कार्यक्षमतेवर एकूण प्रश्नचिन्हच आहे. वास्तविक सध्या शिक्षकांच्या नेमणूका मोठ्या अग्निदिव्यातून होतात. त्यांना पात्रतेच्या अनेक परीक्षा द्याव्या

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

लागतात. अर्थातच 'राजकारण' आणि 'आरक्षण' या दोन्ही गोष्टी अशा पात्रतेच्या प्रयत्नांना सुरुंग लावायला पुरेशा असतात.

आजच्या संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचं सरकारीकरण झालेलं आहे. शिक्षकांच्या नेमणूका, प्रवेश, शुल्क, परीक्षा या सगळ्या सरकाराधीन आहेत. याचे परिणामही आपल्यासमोर आहेत. स्वातंत्र्याला सत्तर वर्षे पूर्ण झाली, पण अजूनही काही अपवाद वगळता जगातल्या शंभर दर्जेदार शैक्षणिक संस्थांमध्ये भारतीय संस्था नाहीत.

चीन हा सगळ्याच बाबतीत आपला एक प्रतिस्पर्धी. साम्यवादाच्या जोखडातून मुक्त होऊन त्यालाही फक्त ३०-३५ वर्षेच झाली आहेत. पण आज उद्योगधंद्यापासून शिक्षणापर्यंत सर्वच क्षेत्रात तो भारतापेक्षा काही पटींनी पुढे आहे. चिनी जीडीपी १४ ट्रिलीयन डॉलर आहे, तर भारताचा जीडीपी केवळ २.२ ट्रिलीयन डॉलर आहे. भारतामध्ये ३ लाख संशोधक आहेत, तर चीनमध्ये १६ लाख. भारताचा शिक्षणावरील खर्च ५७ बिलीयन डॉलर्स (जीडीपीच्या २.६%), तर चीनच्या ५६५ बिलीयन डॉलर्स (जीडीपीच्या ४%). संशोधनावरती भारताचा खर्च १५.४ बिलीयन डॉलर्स (जीडीपीच्या ०.७%) तर चीनचा २७८ मिलीयन डॉलर्स (जीडीपी २.१%) आहे. संशोधनाच्या क्षेत्रात जगामध्ये भारत ५ व्या क्रमांकावर तर चीन १ ल्या क्रमांकावर आहे. जागतिक बँकेनी प्रसृत केलेली ही आकडेवारी आहे. आजही चीन हा साम्यवादी देश आहे. पण तिथली बहुतेक विद्यापीठे मात्र सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त आहेत.

भारतामध्ये निवडून येणारा प्रत्येक राजकीय पक्ष हा आपला जन्मसिद्ध अधिकार असल्यासारखा शैक्षणिक व्यवस्थेमध्ये ढवळाढवळ करतो. वास्तविक आजची भारतीय शैक्षणिक व्यवस्था ही पाश्चिमात्य व्यवस्थेची भ्रष्ट नक्कल आहे. चीनची आजची शैक्षणिक व्यवस्था ही देखील पाश्चिमात्य धाटणीचीच आहे. मूळ पाश्चिमात्य व्यवस्था, त्याच्यावर आधारलेली चिनी व्यवस्था आणि भारतीय व्यवस्था, यामध्ये एवढा फरक का असावा, हा वाटला तरीही संशोधनाचा विषय नक्कीच नाही. याची कारणे आपणा सर्वांना माहीत आहेत - शिक्षणाचे सरकारीकरण. तरीही आपल्या सर्वांचा कायम आग्रह असतो तो अधिक सरकारी हस्तक्षेपाचा.

कुण्या एकेकाळी मिश्र अर्थव्यवस्थेप्रमाणे आपण मिश्र शिक्षणपद्धतीही स्वीकारली. म्हणजे स्वयंसेवी संस्थांना, कुठलेही सरकारी अनुदान घेणार नसाल, तर शिक्षण संस्था काढायला परवानगी दिली. हळूहळू या संस्थांचे सगळ्या स्तरावर सरकारीकरण करण्यात आले आहे.

या सगळ्या अधोगतीचा ठपका ठेवला जातो तो खलनायक मेकॉलेवर. दिशाच्या मे २०१८ च्या अंकाचा अग्रलेख 'शिक्षणाचे मेकॉलीनीकरण' या विषयावरच लिहिला आहे, पण हा विषय इतका सोपा नाही. १८३५ साली मेकॉलेच्या इतिवृत्तामुळे शिक्षण व्यवस्थेत बदल झाला ही गोष्ट खरी आहे. पण ब्रिटिशांनी त्याच वेळेला शिक्षण व्यवस्थेबरोबरच, महसूलापासून प्रशासनापर्यंत सर्व व्यवस्थांमध्ये आमूलाग्र बदल केले. हे बदल नुसते व्यवस्थेतील तांत्रिक बदल नव्हते. व्यवस्थेच्या मूळाशी असलेल्या मूल्यांमधे हा बदल होता.

(पृष्ठ क्र.३९ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



## वर्ष एकोणिसावे/अंक ६/जून २०१८

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

‘दिशा’ प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २२ वे/अंक १२ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | राष्ट्रकूल देशातील शिक्षण समस्येवर चर्चासत्र | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | आरोग्यवेध-०७ शिथिलीकरण | श्री. नरेंद्र गोळे | ६ |
| ४) | ओळख वनस्पतींची - पांगारा | श्री. प्रकाश दुधाळकर | ९ |
| ५) | फ्रान्सचा महान सुपूत्र नेपोलियन | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ११ |
| ६) | ऑक्सफर्ड केंब्रिज व लंडन: आंग्लभूमीचा रोमांचक प्रवासवृत्तांत | प्रा. प्रशांत धर्माधिकारी | २६ |
| ७) | इंग्लंडच्या शैक्षणिक सहलीतील माझे अनुभव | सौ. दीपाली सुनील वाणी | ३२ |
| ८) | येऊ दे तुफान । येऊ दे तुफान । शहरांत आतां । पाण्यासाठी ।। | श्री. सुरेश पित्रे | ३५ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# राष्ट्रकूल देशातील शिक्षण समस्येवर चर्चासत्र

*राष्ट्रकूल देशातील शिक्षण समस्येवर विचार करण्यासाठी लंडनमध्ये एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राचा गोषवारा सदर लेखात दिलेला आहे - संपादक*

ब्रिटिश साम्राज्यात असलेले देश अणि इतर काही देश मिळून राष्ट्रकूल (Commonwealth) परिषद बनलेली आहे. आजच्या घडीला या संघटनेत ५३ देश आहेत. यामध्ये न्यू झिलंड, कॅनडा यासारख्या प्रगत देशांबरोबरच भारत, मलेशिया, नायजेरिया असे विकसनशील देश तसेच लिसोथो, झाम्बिया यासारखे अप्रगत देशदेखील आहेत. प्रत्येक देशाची समस्या वेगळी आहे. त्यावर एकत्रितपणे मात करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी राष्ट्रकूल देशातील तज्ज्ञ अधूनमधून एकत्र येत अस्तात. परिषदेचे अध्यक्षपद ब्रिटनच्या राणीकडे असून लंडनमध्ये ट्रॅफलगर चौकाजवळ मार्लबोरो हाऊस (Marlborough House near Trafalgar square) येथे त्याचे मुख्यालय आहे. या परिषदेच्या सभासद देशांच्या प्रमुखांची नियमितपणे बैठक होत असते. त्याचबरोबर या देशातील शिक्षणमंत्री देखील नियमितपणे भेटत असतात. त्यातून काही योजना विकसित होतात. त्या एकत्रितपणे राबविण्यात येतात.

पुढच्या पिढीचे शिक्षण हा सर्वच देशांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. या बाबीकडे विशेष लक्ष पुरविण्यासाठी कौन्सिल फॉर एज्युकेशन इन दि कॉमनवेल्थ (Council for Education in the Commonwealth) या संघटनेची स्थापना करण्यात आली. ही संघटना सभासद देशातील शालेय व महाविद्यालयीन शिक्षण सुधारण्यासाठी प्रयत्न करीत असते. वेगवेगळ्या देशांतील लोकांचे विचार आणि अनुभव यांची देवाणघेवाण करता यावी यासाठी ही संघटना नियमितपणे चर्चासत्राचे आयोजन करीत असते. असेच एक चर्चासत्र २२ मे २०१८ रोजी लंडनमध्ये आयोजित करण्यात आले होते. माझा राष्ट्रकूल परिषदेच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि गणित शिक्षण (Commonwealth Association of Science, Technology and Mathematics Educators) या गटाशी जवळचा संबंध आहे. त्यामुळे अशा चर्चासत्रांची मला निमंत्रणे येत असतात. त्यातील मोजक्याच चर्चासत्राला मी जातो. जगाच्या वेगवेगळ्या ठिकाणी भागात ही चर्चासत्रे आयोजित केली जात असल्याने सगळ्या ठिकाणी जाणे मला शक्य होत नाही. परंतु २२ मे २०१८ रोजी मी योगायोगाने लंडनमध्येच होतो. विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते. या वर्षी ही सहल १५ ते २५ मे २०१८ या कालावधित आयोजित करण्यात आली होती. या सहलीत सहभागी झालेल्या सभासदांना मार्गदर्शन करण्यासाठी मी जात असतो. २० ते २५ मे २०१८ या कालावधित आमचा मुक्कम लंडनमधेच होता. या संधीचा उपयोग करून मी एका दिवसाच्या चर्चासत्राला उपस्थित राहिलो. या चर्चासत्राचा गोषवारा प्रस्तुत लेखात सादर केलेला आहे.

चर्चासत्राचे आयोजन लंडनच्या ब्रिटिश कौन्सिल (British Council) कार्यालयात केले होते. लंडनच्या प्रसिद्ध ट्रॅफलगर चौकाजवळच हे कार्यालय आहे. हा परिसर मला चांगला माहीत असल्याने तेथे पोहोचायला मला काहीच त्रास झाला नाही. मी वेळेच्या आधिच इच्छित स्थळी पोहोचलो होते. केवळ निर्मंत्रितानाच तेथे प्रवेश होता. त्यामुळे आमच्याकडे निमंत्रण असल्याची

जो मनुष्य पक्षी आणि जनावरे यांच्यावर माणसाइतकेच प्रेम करतो, त्याने प्रार्थना केल्यासारखीच आहे. - कॉलेरिज




**चर्चासत्राचा फलक**

तसेच निमंत्रणपत्रिकेवर जे नाव आहे तीच ही व्यक्ती आपल्यापुढे आहे याची खात्री करून घेतल्यानंतरच आम्हाला आत सोडण्यात आले. चर्चासत्र सुरू व्हायला वेळ होता. आयोजकानी चहापानाची सोय केली होती. हातात चहाचा कप घेऊन मी तिथे उपस्थित असलेल्या लोकांशी गप्पा मारू लागलो. तज्ज्ञ लोकांबरोबर ओळख करून घेण्याचा हा चांगला मार्ग आहे हे मला आता अनुभवाने कळले आहे. लवकरच चर्चासत्र सुरू होत असल्याची वर्दी देण्यात आली. सर्वजण आपापल्या जागेवर जाऊन बसले. मी प्रेक्षकांवर जरा नजर टाकली. त्यात स्थानिक लोकांबरोबरच इतर देशातील लोकही मोठ्या प्रमाणावर असल्याचे जाणवत होते.



**चर्चसत्रातील प्रेक्षकगण**

चर्चसत्राचा मुख्य विषय होता 'राष्ट्रकूल देशातील शिक्षणाची सामान्य मूल्ये' (Shared Commonwealth Values in Education: Where are we?). या क्षेत्रात आपण सध्या कोठे आहोत आणि आपल्याला किती वाटचाल करावयाची आहे याचा लेखाजोखा घेण्यासाठी तेथे लोक जमले होते. 'सर्वांसाठी शिक्षण' (Education for All) हा राष्ट्रकूल गटातील देशांचा सामान्य कार्यक्रम आहे. परंतु आजही अनेक देश आहेत की तेथे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झालेले नाही. भारतात ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत आणि सक्तीचे (Free and compulsory) करण्यात आले आहे. स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे झाली तरीही आपण हे साध्य करू शकलेलो नाही. आफ्रिकेतील काही देशांची स्थिती तर याहूनही वाईट आहे. तेथे शालाबाह्य मुलामुलींची संख्या खूप मोठी आहे. या समस्येवर मात कशी करता येईल यावर विचार प्रगट करण्यासाठी जगाच्या वेगवेगळ्या भागात काम करणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते.



**प्रगत तसेच अप्रगत देशातील तज्ज्ञ आपले विचार मांडताना**

शालेय शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रत्येक देशातील सरकार करीत असते. त्यांच्या या कामात त्या त्या देशातील स्वयंसेवी संस्था हातभार लावत असतात. तरीही या कामाला यश आलेले नाही. शाळेत न येणाऱ्या आणि एकदा शाळेत आल्यावर शाळा मध्येच सोडून जाणाऱ्या मुलांची आकडेवारी एका वक्त्याने सादर केली. हे आकडे फारच धक्कादायक होते. त्यातील बरेच विद्यार्थी बालकामगार म्हणून कामाला लागतात. अप्रगत देशातील मुलींचे शिक्षण हा तर स्वतंत्र विचार करण्याचाच विषय आहे. त्यावर

ज्यांनी आपले आत्मे प्रार्थनेत बुडविले आहेत, ते कुठलेही दुःख शांतपणे सहन करू शकतात. – आर. मिल्नेस

काही वक्त्यांनी प्रकाश टाकला. परंतु वेळेच्या अभावामुळे त्याची साधकबाधक चर्चा करता आली नाही.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात येणाऱ्या अडचणींचा या चर्चासत्रात प्रामुख्याने ऊहापोह करण्यात आला. दुर्गम भागात शाळा नसणे हे एक कारण सांगण्यात आले. त्यासाठी नवनवीन शाळा उघडण्याची मोहीम राष्ट्रकूल परिषदेने हाती घ्यावी असे सुचविण्यात आले. बऱ्याचदा शाळेची इमारत आहे परंतु तेथे शिकविण्यासाठी पूर्णवेळ शिक्षकच नाहीत अशी परिस्थिती असते. ते टाळण्यासाठी शिक्षकांना उत्तेजन देऊन त्याना दुर्गम भागात पाठवावे असे सांगण्यात आले. शिक्षकीपेशा जोपर्यंत प्रतिष्ठेचा मानला जात नाही तोपर्यंत कर्तबगार मंडळी या व्यवसायाकडे वळणार नाहीत. त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे असे माझे मत मी तिथे मांडले. या मताला अनेकांनी दुजोरा दिला. काही देशांमध्ये अशांत परिस्थिती आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात या बाबीची देखील दखल घेण्याची गरज आहे असे प्रतिपादन करण्यात आले. या सर्व बाबींचा सांगोपांग विचार होणे आवश्यक आहे असे आग्रही मत आफ्रिकेतील काही तज्ज्ञानी मांडले. शिक्षण हे एक सामाजिक कार्य आहे आणि त्याच्या विचार एक सामाजिक समस्या म्हणूनच केला पाहिजे असा एकूण सूर होता. एकांगी विचार करून ही समस्या सुटण्यासारखी नाही. त्यासाठी समस्येचा एकात्मिकपणे विचार करण्याची गरज आहे यावर सर्वांचे एकमत झाले. हेच मत चित्ररूपाने खाली स्पष्ट केले आहे.




**सर्वसमावेशक शिक्षणाचे अधिष्ठान**

टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात मी चार दशके काम केले आहे. या कालावधित मी माझे लक्ष शैक्षणिक समस्या आणि त्यांचे निराकरण यावरच केंद्रित केले होते. ज्याची पहिली पिढी शाळेत येते आहे अशा विद्यार्थांना येणाऱ्या शैक्षणिक अडचणींचा अभ्यास करून त्यांचे निराकरण करण्यासाठी मी काही अध्यापन पद्धती विकसित केल्या. त्यांना 'उपचारात्मक अध्यापन पद्धत' म्हणून ओळखले जाते. समाजाच्या दुर्बल गटातील विद्यार्थी शिक्षणात मागे पडतात याचे कारण त्यांच्याकडे शिक्षणासाठी लागणारी बुद्धिमत्ता नाही असे बऱ्याचदा सांगितले जाते. खरे कारण असे आहे की, त्यांच्या मार्गात अनेक अडसर येत असतात. हे दूर केले की या विद्यार्थ्यांची देखील चांगली प्रगती होते हे मी माझ्या संशोधनातून दाखवून दिले आहे.

चर्चासत्राचा विषय 'सर्वसमावेशक शिक्षण' या बाबीशी निगडित असल्याने मला माझ्या कामाविषयी या चर्चासत्रात बोलायला चांगलाच वाव होता. त्या संधीचा मी उपयोग करून घेतला. वेळेचे बंधन असल्याने मला सविस्तर बोलता आले नाही. तरीही मी हे पटवून दिले की, 'शिक्षणाची समान संधी' हेच या समस्येवर उत्तर आहे. खालील चित्र या बाबतीत बरेच काही सांगून जाते. एकाच प्रकारचे शिक्षण सर्वांना देऊन समस्येचे निराकरण करता येणार नाही. ज्याला गरज आहे त्याला थोडे जास्त देण्याची गरज असते. तेव्हाच समाजात समानता आणता येईल, अन्यथा नाही असे आग्रही प्रतिपादन मी केले.




**समान संधीचे बोलके उदाहरण**

(पृष्ठ क्र. ८ वर)

मुर्खाची प्रशंसा केली की, त्याचा मूर्खपणा फोफावू लागतो. - डब्ल्यू. जी. बेनहॅम

# आरोग्यवेध-०७ शिथिलीकरण

*रोगग्रस्त, अस्वस्थ, अवघडलेल्या स्थितीत कुठलेही इतर व्यायाम, प्राणायामादी प्रकार करण्याआधी शरीर पूर्णतः सैलावण्याची गरज असते. हे साधण्याच्या प्रक्रियेस प्रगतीशील शिथिलीकरण उपयोगी ठरते. शिथिलीकरणाची माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

शरीर दैनंदिन जीवनात अनंत ताणतणावांचा सामना करते. त्यांच्यातून मुक्ती मिळविते. न जमल्यास त्यांना शरण जाते. तेव्हा ते ताण, मान, खांदा, पाठ, कंबर, गुडघे, घोटे इत्यादी आणि इतरही सर्व अवयवांमधून अवघडून राहतात. त्यांना मुक्तीची अपेक्षा असते. विशेषतः जे निदानित हृदयरुग्ण असतात त्यांच्यात तर ताणतणावांना शरण जाण्याची प्रवृत्ती घडत जाते. म्हणून रोगग्रस्त, अस्वस्थ, अवघडलेल्या स्थितीत कुठलेही इतर व्यायाम, प्राणायामादी प्रकार करण्याआधी शरीर पूर्णतः सैलावण्याची गरज असते. हे साधण्याच्या प्रक्रियेस प्रगतीशील शिथिलीकरण उपयोगी ठरते.

प्रगतीशील शिथिलीकरण म्हणजे एकेका अवयवास मार्गदर्शनाखाली तणावमुक्त करत, सावकाश, संपूर्णरित्या सैलावणे. यासाठी शवासनाच्या स्थितीत उताणे पडून राहून, सांगितलेल्या अवयवास ताण देऊन सैल सोडणे, असे पायाच्या बोटांपासून कपाळावरील आठ्यांपर्यंत करत गेले की शरीर सैलावते. ह्यामध्ये जाणीवपूर्वक ताणून सैल सोडण्याने आखडलेले सांधे मोकळे होण्यास मदत होते.

डॉ. बालाजी तांबेंनी काढली आहे तशाप्रकारच्या योगनिद्रा सीडींचाही उपयोग होऊ शकतो. डॉ. राजेंद्र बर्वे ह्यांचे एक पुस्तक आहे, 'तुमची झोप तुमच्या हाती'. त्यामध्येही मार्गदर्शनासह आणि स्वतःहून केलेल्या शिथिलीकरणाच्या प्रक्रिया दिलेल्या आहेत.

अवघडलेल्या शरीरभागाकडे मनाचे लक्ष वेधून, जाणीवपूर्वक तेथे साखळलेले तणाव शिथिल करणे, हाच ह्या सर्व प्रक्रियांचा उद्देश असतो, असावा. मात्र, हे साधल्यानंतरच इतर आरोग्यसाधनेचे शारीरिक कार्यक्रम अंमलात आणावेत. तरच ते यशस्वी होऊ शकतात.

रात्रीची झोप व्यवस्थित लागणे हेही संपूर्ण शिथिलीकरण साधण्याकरता आवश्यक असते. निद्रेची चिरफाड हा डॉ. श्रीराम दिवटे यांनी मिसळपाव डॉट कॉम वर लिहिलेला एक लेख यासंदर्भात वाचनीय आहे. त्याचा दुवा http://www.misalpav.com/node/१४०५३ हा आहे. डॉक्टर साहेब म्हणतात, 'निद्रादेवी एकटी नसून त्या दोन जुळ्या बहिणी असतात. भिन्न स्वभावाच्या, विरोधी आचरणाच्या. रात्रभर त्या फेर धरून कधी झिम्मा, कधी लपाछपी, तर कधी खोखो खेळतात. एकीने व्यक्तीला झोपवले की दुसरी त्या व्यक्तीला उठवण्याचा, जागते ठेवण्याचा प्रयत्न करते. एकीचं नाव शांता. ती नावाप्रमाणेच शांत झोपेचं वरदान देते. तिला शास्त्रीय परिभाषेत नॉन-रॅपीड-आय-मूव्हमेंट स्लीप (नॉनरेम) म्हणायचं. तर दुसरीला रॅपीड-आय-मूव्हमेंट स्लीप (रेम) अर्थात परखड भाषेत 'चळमुंगळी' म्हणायचं. हीच बया फार त्रासदायक असते. हीच व्यक्तीला 'जागते रहो' ची साद घालत सतावते. नॉनरेम निद्रेच्या १, २, ३, ४ अशा उत्तरोत्तर गडद होणाऱ्या प्रत्येकी ९० मिनिटांच्या पायऱ्या असतात. म्हणजे शांतेची चौथी स्टेज ही प्रगाढ वा साखरझोप असते. वाढत्या टप्प्याप्रमाणे चौथ्या स्टेजला एकदम परब्रह्म समाधीच लागते इतकी की, काही कोवळ्या नवजात बालकांना

किंवा मृत्युशय्येवरील वयस्कांना याचवेळी स्वर्गाची द्वारे खुली होतात! हूं नाही की चूं नाही, डायरेक्ट मुक्तीच. अशा 'शांते'चं गुणवर्णन करावं तितकं कमीच. असो. तर, या नॉनरेमच्या चारही स्टेजमध्ये हटकून व्यत्यय आणते ती रेमनिद्रा. ती साधारणतः ५ ते ३० मिनिटे (व्यक्तिपरत्वे) प्रत्येकाला सतावते. याच काळात डोळे गरागरा फिरवून व्यक्ती चाळवली जाते. रेम मध्ये पडलेली वाईट स्वप्ने दिवसाही आठवून भिववतात. हिच्यामुळेच व्यक्ती झोपेत बावचळतात. एकंदर हिचं वर्तनच हानिकारक आणि म्हणूनच जेव्हा या बयेचा ताल बेताल होतो (३० मिनिटांपेक्षा अधिक) तेव्हा आपल्याला नीटशी झोप लागत नसते, आपण अनिद्रेची तक्रार करतो.

तुमचे लक्ष अचानक वेधून घेतले जाणार नाही, तुम्हाला कोणी अवचित पुकारणार नाही, ध्यानात व्यवधान आणणार नाही असा किमान तास/अर्धा तास प्रत्येक व्यक्तीस दररोज उपलब्ध असावा. अशा वेळेस शक्य झाल्यास एकांतवासात, शवासनात पडावे. घड्याळ, मोबाईल, दरवाजाची घंटी इत्यादी वस्तू बंद / उपद्रवहीन कराव्या. साऱ्या शरीरास, मनास एका स्थिरपद अवस्थेत आणून निष्पंदभाव प्राप्त करावा. विचारांची आवर्तने शांत करावी. आजूबाजूच्या जगाकडे केवळ साक्षीभावाने पाहावे. त्याच्या व्यवहारात सहभागी होऊ नये. त्यात दखल-अंदाजी करू नये. ध्यान करावे. जप करावा. चिंतन करावे किंवा नुसतेच निष्पंद, स्पंदहीन व्हावे. रोज किमान एकदा, काही काळ तरी, असा विश्राम मिळाला तर, शरीर / मनास शिथिल होण्याची संधी मिळते आणि स्वस्थतेची किमान एक पायरी तरी गाठली जाते.

खूप वेळ प्रतीक्षेत ताटकळत राहावे लागले की हमखास इथे तिथे तणाव साचत जातात. हिंदी मालिकेतल्या प्रौढ स्त्रिया म्हणतात, जरा कमर सिधी कर लूँ !, त्याप्रमाणे मग काही क्षण जरी उताणे पडून शरीर ताणून घेता आले तर भरपूर तणावांना मोक्ष मिळू शकतो. पण मग ज्याकरता प्रतीक्षा चाललेली होती, ती महत्त्वाची घटना पुढ्यात येऊन उभी राहते. अशा वेळी सहज सतर्क, स्वस्थचित्त, सावधचित्त, दत्तचित्त कसे होता येईल हा कळीचा प्रश्न आपणा सगळ्यांनाच केव्हा ना केव्हा पडत असतोच. पूर्वापेक्षित महत्त्वाच्या घटनेस सामोरे जायला अक्षरशः काही मिनिटेच बाकी असतांना ह्या प्रश्नाचे उत्तर शोधायचे कसे? माणसाच्या मनोकायिक व्यवहारांची सम्यक जाण करून घेतलेली असल्यास, उपलब्ध असलेल्या अल्पावधीतच आपण सैलावून घेऊ शकतो. अशा स्थळी आडवे होण्याची संधी क्वचितच मिळते. पण मग बसल्या बसल्याच, किंवा उभे राहून इकडेतिकडे हातपाय मोकळे करण्याची संधी मिळाल्यास, किंवा न मिळाल्यासही कशीही साधून; माणसाने हातपाय ताणून घ्यावे, मनास क्षणभर का होईना निष्पंदभावात स्थिर करावे, दीर्घ श्वास घ्यावा, जणू काय लांब-उडी मारायला धावत निघालो आहे असा आविर्भाव मनात आणावा. कृती नव्हे केवळ आव. त्यानेही मनास उभारी येते. शरीर प्रसंगास सादर होते.

मी तर काही लोक असे बघितले आहेत की, त्या अल्प वेळातच ते चक्क बसल्या जागी झोप घेतात. त्यांना डुलकी लागते. तरीही ते न पडता बसून राहिलेले असतात. सेवक त्यांना प्रतीक्षेतून उठून मुलाखतीस बोलवायला येतो. तेव्हा त्याला त्यांना जागे करावे लागते. अशा झोपेला हल्ली सामर्थ्य डुलकी (पॉवर नॅप) म्हणतात. ती घेणारा ताजातवाना होतो. नव्या उमेदीने मग तो मुलाखतीस सामोरे जाऊ शकतो. एन.सी.सी.च्या कवायतीदरम्यान दीर्घकाळ भाषणे ऐकत उभे राहावे लागते तेव्हा पाय टेकीस येतात. आमचे प्रशिक्षक तेव्हा असे सांगत असत की, बुटातल्या बुटातच पायाच्या अंगठ्यांची हालचाल करा, पावले वळवा, हालचाल करा म्हणजे थकव्याने ग्लानी येणार नाही. खरेच होते

स्तुतीने चांगली माणसे सुधारतात, तर वाईट माणसे बिघडतात. - थॉमस

ते. मरगळलेल्या, थकलेल्या अवस्थेतून मना-शरीरास बाहेर काढण्याचा मार्ग म्हणजे शिथिलीकरण. सैलावणे.

कृती नाहीच. मनाचा केवळ समज असा करून घ्या की, आपल्यापाशी सैलावण्याकरता प्रचंड मोठा वेळ उपलब्ध आहे. ही कृती झाल्याखेरीज करावे असे काहीही आपल्यासमोर नाहीच आहे. हे साधे पर्यंत आपल्याला विचलित करेल असेही काही अस्तित्वातच नाही आहे. आपण एकदाचे ह्या सुस्थितीत पावते झालेलो आहोत. असा विचार दृढ होण्यानेच केवळ शैथिल्य जीव धरू लागते. मग कायिक शैथिल्याचे शक्य ते सर्व उपाय करावेत. अखेरीस दीर्घ श्वसन करून, परिस्थितीस सामोरे जाण्यास सज्ज व्हावे. स्वतःची तशी मनोकायिक अवस्था प्राप्त करून घ्यावी. स्वस्थचित्त, सावधचित्त, दत्तचित्त व्हावे. मग निर्माण झालेली एकाग्रताच, आपल्याला ईप्सित यशाप्रत अलगद घेऊन जाईल.

**संदर्भः**


१. डॉ. बालाजी तांबेंची योगनिद्रा सीडी https://www.amazon.com/Yoga-Nidra-Music-Meditation-Peace/dp/B00EX4MM3W

२. 'तुमची झोप तुमच्या हाती', डॉ. राजेंद्र बर्वे, मनोविकास प्रकाशन, १-८-१९८७, रु.१२/-

३. डॉ. श्रीराम दिवटे यांनी मिसळपाव डॉट कॉम वर लिहीलेला एक लेख, २५-०८-२०१०, http://www.misalpav.com/node/14053



**- नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,

टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,

डोंबिवली (पू.) - ४२१२०१

भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५

Email : narendra.v.gole@gmail.com


•••

(पृष्ठ क्र. ५ वरुन ... **राष्ट्रकूल देशातील शिक्षण समस्येवर चर्चासत्र**)

कौन्सिल फॉर एज्युकेशन इन दि कॉमनवेल्थ दरवर्षी चर्चासत्राचे आयोजन करते. पुढच्या वर्षी हे चर्चासत्र ग्रेनाडा (Grenada) या बेटावर आयोजित करण्यात आले आहे. ग्रेनाडा हे निसर्गाने नटलेले अटलांटिक समुद्रातील लहानसे बेट आहे. मसाल्याच्या पदार्थांसाठी हे बेट प्रसिद्ध आहे. या बेटावर सेंट जॉर्जेस (Saint Georges University) नावाचे एक प्रसिद्ध विद्यापीठ आहे. या विद्यापीठात देशोदेशीचे विद्यार्थी शिक्षण घ्यायला येतात. चर्चासत्राचे निमंत्रण देण्यासाठी या विद्यापीठाचे काही प्राध्यापक आले होते. २२ आणि २३ मे २०१९ रोजी सेंट जॉर्जेस विद्यापीठात, 'विद्यार्थी हीच आमची सामाईक संपत्ती' या विषयावर साधकबाधक चर्चा होणार आहे. जर कुणाला या चर्चासत्रात सहभागी व्हायचे असेल तर त्यांनी आत्तापासूनच तयारीला लागावे.




**ग्रेनाडा बेटाचे पृथ्वीच्या नकाशावरील स्थान**


**- डॉ. सुधाकर आगरकर**

सी-१४, विसावा, वैभवनगरी,

कल्याण-शीळ रोड,

काटई, ता. कल्याण,

जि. ठाणे - ४२१२०४


•••

# ओळख वनस्पतींची
## पांगारा

*'पांगारा' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, निसर्गात सध्या हिरव्या आणि पिवळ्या रंगाचे प्राबल्य आहे. अजूनही एखाद दुसरी पावसाची सर येऊन जाते अन् हिरवा रंग पुनः ताजातवाना होतो. त्यावर पिवळ्या रंगाची फुले, कधी मध्येच गुलाबी रंगाचा शिकडावा, नाही म्हणायला कळलावीचा रक्तवर्णी आविष्कार कुठे कुठे जाणवतो. त्यातही पिवळ्या रंगाचेच पारडे जरा भारी असते. आश्विन संपेपर्यंत तरी हिरव्याचीच दादागिरी चालू असते. ही सद्दी कार्तिकानंतर ओसरायला सुरवात होते. हिरव्याकडून पिवळ्याकडे अन् नंतर येलो ऑकर (याला मराठीत काय म्हणायचे) असा प्रवास करीत मार्गशीर्षापर्यंत तपकिरी भुरकट रंगाकडे हा प्रवास सुरू होतो. हळूहळू झाडे आपली सारी पाने गाळून निष्पर्ण होतात. एक उदासलेपण सर्वत्र जाणवते. आंब्यासारखी काही झाडे मात्र आपला हिरवा पोपटी साज सतत जवळ बाळगून असतात. आसमंतात मात्र वाळक्या पानांची सळसळ जीवाची घालमेल करते.





झाडांच्या बुध्यांशी पडलेल्या पाचोळ्यावर पाय ठेवायलाही मन कचरते. जीवाची घालमेल चालू असतानाच वाळलेल्या पानांवरून काहीतरी सरसरत गेल्याचा आवाज येतो. पानांच्या तपकिरी भुस्कट रंगात बेमालूम मिसळलेला सरडा झाडाच्या बुंध्यावर बसून कशी जिरवली म्हणून हिणवत असतो. मन पुनः उदास होतं.

अन् थोड्याच दिवसात चमत्कार घडतो. लाल रंगाच्या ध्वजा घेतलेले शेवरी, पळस अन् पांगारे हळूहळू पुढे येतात मनाला आलेली मरगळ क्षणात उडून जाते. निसर्गात पुनः विविध रंगांची उधळण होणार याची ती पूर्वसुचना असते. पांगारा आपली रक्तवर्णाची फुले घेऊन सर्वात आधी हजेरी लावतो. अर्थात भौगोलिक परिस्थितीनुसार थोडे मागेपुढे होतेच. पांगाऱ्याची फुले पूर्णपणे लाल रंगाची, रंग पेटीतील स्कार्लेट रंगाशी जुळणारी. याचे इंग्रजीतील नावही Indian Coral tree म्हणजेच 'माणकाचे झाड'. माणिक हे लाल रंगाचे रत्न

---

माणसांचे बळी घेणाऱ्या साथीप्रमाणे अधिकार हा ज्याला त्याला म्हणून स्पर्श करतो ते तो कलंकित करून टाकतो. - शेले

अशी ही माणकं झाडांच्या शेंड्याशेंड्यावर फुललेली पाहतांना मन हर्षोल्हासित होऊन जातं. पांगाऱ्याचे शास्त्रीय नाव आहे Erythrina indica. एरीथ्रिना म्हणजेच रक्तवर्णी. अनेक रक्तवर्णी फुलांचा या वर्गात समावेश होतो.

पांगारा हा एक मध्यम उंचीचा वृक्ष अनुकूल वातावरणात चांगला २० मीटर पर्यंत वाढतो.पांढुरका बुंधा, सरळ आकाशाकडे झेपावणाऱ्या फांद्या, या फांद्यांना काट्यांचे भक्कम संरक्षण. झाड लहान असतांना संपूर्ण खोड देखील काट्यांनी आच्छादलेले असते. जसजसे झाड जुने होत जाते तसे खोडाच्या वाढीसोबत बुंध्यावरचे काटे गळतात. मात्र ते फांद्यांवरील आपली जागा सोडत नाहीत.

पळसाच्या झाडाप्रमाणेच तीन पत्रकांची संयुक्त पर्णदले असतात. पर्णिकांची लांबी १२ ते १५ सें. मी. अन् हृदयाकृती आकार, पानांवर हिरव्या रंगासोबत पिवळ्या रंगाची छटा. फेब्रुवारीच्या सुमारास झाड पूर्ण पर्णहीन होते अन् त्यावर लाल रंगाच्या फुलांचा फुलोरा फादीफांदीवर दिसू लागतो. ही फुलेही वैशिष्ट्यपूर्ण असतात. २० ते ३० सें. मी. लांबीच्या पुष्पदंडावर चहूबाजूंनी लाल रंगाच्या लांब कळ्या येऊन त्या खालून वर अशा क्रमाने फुलू लागतात. प्रथम एक पाकळी विलग होऊन हळूहळू उर्वरीत पाकळ्या दोन बाजूस उमलतात. पहिली पाकळी ही इतर पाकळ्यांपेक्षा मोठी तसेच दुमडलेली असते. त्यामुळे लांबून ही फुले लांब पेल्यासारखीच वाटतात. या पेल्याच्या मधून लाल रंगाचे टोपीधारी पुंकेसर बाहेर डोकावत असतात.

पांगारा फुलला की परिसरातील पक्ष्यांची व मधमाशांची झाडावर नुसती झुंबड उडते. यात कावळे, कोतवाल, भोरडी, मैना, बुलबुल हे पक्षी सतत येत असतात. एप्रिल, मे मध्ये झाडाला ६ ते ८ सें. मी. लांबीच्या गोल शेंगा येतात. त्यात कठीण कवचाच्या गोलसर बीया असतात. त्याच सुमारास झाडावर नवीन पालवी येऊन या शेंगा हिरव्या रंगात मिसळून जातात.

या झाडाची लागवड या बीयांपासून करता येते. याची नुसती फांदी जरी ओलसर जमिनीत खोचली तरी ती लगेच रुजून झाड भराभर वाढू लागते. याचे लाकूड मऊ अन् हलके असून ते कलाकुसरीच्या कामासाठी वापरतात. सावंतवाडीची प्रसिद्ध लाकडी फळे याच लाकडांपासून करतात. पांगाऱ्याची हल्ली मुद्दाम लागवड केली जाते. विड्याच्या पानाच्या वेलींना आधार देण्यासाठी, तसेच पिंपरीच्या वेलींना आधार म्हणून याची लागवड केली जाते. याला असलेल्या वाश्यांमुळे कुंपणासाठी देखील याची लागवड करतात. याची पाने अधिक नत्रयुक्त असल्याने या पासून जमिनीला उत्कृष्ट खत मिळते.

पांगाऱ्याची पाने रेचक गुणधर्माची असून नवमातांना अधिक दूध येण्यासाठी देतात, सांध्यांना येणारी सूज व जळजळ यासाठी देखील वापरतात. या झाडाची साल विविध आजारात उपयोगी आहे. तसेच ती वेदनाशामकही आहे. मात्र कोणतेही औषधी उपयोग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करणेच योग्य. अन्यथा अपाय होऊ शकतो. बियांचा देखील औषधी उपयोग आहे. गुरांना उत्तम चारा म्हणूनही पानांचा वापर होतो. असे सर्वांग उपयोगी असलेले झाड मुंबईत बऱ्याच ठिकाणी लावलेले आहे. पण गेल्या १०-१२ वर्षांपासून फुले मात्र येत नाहीत. मुंबईबाहेर मात्र ही झाडे छान फुललेली दिसतात.

**- प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी - ९८६९५४१९६६

दरिद्री लोकांनीच सर्व कलांचा शोध लावलेला आहे. - प्लॉटस

# फ्रान्सचा महान सुपूत्र नेपोलियन

**भाग १**

*महान सेनापती, कुशल प्रशासक व श्रेष्ठ राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या फ्रान्सच्या नेपोलियन ह्या सम्राटाविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

नेपोलियनला त्याच्या काळातील सर्वश्रेष्ठ सेनानी व सेनापती म्हणून ओळखले जाते. नेपोलियनने फ्रान्सची सत्तासूत्रे स्वतःच्या हाती घेतल्यानंतर फ्रेंच साम्राज्याचा युरोपमध्ये विस्तार केला. पश्चिम तसेच मध्य युरोपातील बराचसा भाग नेपोलियनकालीन फ्रान्सच्या साम्राज्याचा भाग होता. नेपोलियनची ख्याती फक्त एक श्रेष्ठ सेनापती व योद्धा म्हणूनच नव्हती तर तो एक उत्तम प्रशासक म्हणून देखील प्रसिद्ध होता. नेपोलियनने फ्रान्सचा शासक बनल्यानंतर फ्रान्सची विस्कटलेली प्रशासकीय घडी अतिशय व्यवस्थित करून ती सुस्थितीत आणली होती. नेपोलियनने फ्रान्सच्या बाबतीत केलेले अप्रतिम काम म्हणजे त्याने तयार केलेली 'नागरी कायदे संहिता' होय. नेपोलियन सत्तेवर येण्यापूर्वी फ्रान्समधील कायदेविषयक स्थिती गोंधळाची होती. परंतु नेपोलियनने विविध बाबतीतले सुटसुटीत कायदे करून त्यांची नागरी संहिता, कायदे तयार केले. ह्या नेपोलियनच्या नागरी कायद्यांच्या संहितेला इंग्रजीमध्ये 'कोड नेपोलियन' (Code Napoleon) असे म्हणतात. ही नगारी कायदा संहिता २१ मार्च १८०४ पासून फ्रान्समध्ये लागू झाल्याचे आपणास आढळते. असे म्हटले जाते की, एकदा नेपोलियन म्हणाला होता की, त्याने त्याच्या कारकिर्दीत केलेले सर्वोत्कृष्ट काम म्हणजे 'कोड नेपोलियन' हे होय व त्यासाठी त्याला फ्रेंच जनता कायमस्वरूपी लक्षात ठेवील. नेपोलियनने घडवून आणलेल्या प्रशासकीय सुधारणा आपणास फ्रान्समध्ये व नेपोलियनच्या काळात फ्रान्सच्या साम्राज्याचा भाग असलेल्या युरोपिय प्रदेशांमध्ये आजही सकृतदर्शनी पहावयास मिळतात. नेपोलियनने विविध क्षेत्रांत भरीव कामगिरी केलेल्या लोकांचा यथायोग्य आदरसत्कार करण्यासाठी 'लिजियॉन ऑफ ऑनर' - Legion of Honour ह्या पुरस्काराची/ किताबाची सुरुवात केली. हा पुरस्कार लष्करी तसेच नागरी क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेल्या व्यक्तीला बहाल केला जातो. येथे एक बाब नमूद करावीशी वाटते व ती म्हणजे, भारतातील हिंदी चित्रपट सृष्टीतील सिनेअभिनेता शाहरुख खान व 'द टाईम्स ऑफ इंडिया' ह्या प्रसिद्ध इंग्रजी वृत्तपत्राचे माजी संपादक व कार्यकारी व्यवस्थापकीय संपादक कै. दिलीप पाडगावकर या दोन भारतीयांचा फ्रान्सच्या सरकारने 'लिजियॉन ऑफ ऑनर' हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केलेला आहे. दुर्दैवाने दिलीप पाडगावकर यांचे २०१६ मध्ये वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांचा जन्म १९४४ साली पुण्यामध्ये झाला होता. त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयातून घेतले व ते उच्च शिक्षणासाठी पॅरिसमध्ये गेले होते. त्यांनी १९६० च्या दशकापासून 'द टाईम्स ऑफ इंडिया' ह्या भारतीय इंग्रजी वृत्तपत्रासाठी काम करण्यास सुरुवात केली व आपण पाहिल्याप्रमाणे ते ह्या पत्राच्या संपादक ह्या पदापर्यंत पोहोचले. असो.

नेपोलियनचा जन्म १५ ऑगस्ट १७६९ रोजी भूमध्य सागरातील कोर्सिका (Corsica) ह्या बेटावरील अजासियो (Ajaccio) या ठिकाणी झाला होता. मुळात हे बेट इटलीतील जिनोआ (Genoa) ह्या नगर राज्याचा (City State) घटक होते. जिनोआ हे शहर इटलीतील लिगुरिया (Liguria) ह्या प्रांताच्या राजधानीचे ठिकाण

आपले विचार दरिद्री असले की आपण कंगाल बनतो. - इमरसन

आहे. हे शहर भूमध्यसागराच्या किनाऱ्यावर वसलेले असून मध्ययुगात नवीन जगाचा म्हणजेच अमेरिकेचा शोध लावणारा प्रसिद्ध दर्यावर्दी ख्रिस्तोफर कोलंबस याचा जन्मदेखील इसवी सन १४३६ मध्ये जिनोआ ह्या शहरातच झाला होता. पुढे चालून स्पेनच्या राज्यकर्त्यांनी ख्रिस्तोफर कोलंबसला युरोप व पूर्वेकडील भारत व चीन अशा देशांना जोडणारा जलमार्ग शोधून काढण्यासाठी आर्थिक मदत केली व कोलंबसला अपघाताने अमेरिका खंडाचा शोध लागला. असो. ह्याचा अर्थ असा होतो की, नेपोलियन हा जन्माने इटालियन होता. नेपोलियनच्या वडिलांचे नाव कार्लो मारिया डी बोनापार्ट (Carlo Maria di Buonaparte) तर आईचे नाव लेटिसिया रोमालिनो बोनापार्ट (Leticia Romalino Buonaparte) असे होते. नेपोलियन जरी जन्माने इटालियन असला तरी त्याचा जन्म झालेले बेट अगोदर नमूद केल्याप्रमाणे कोर्सिका हे होते व ते इटलीतील जिनोआ ह्या प्रांताच्या ताब्यात होते. त्यामुळे अर्थातच नेपोलियन स्वतः वंशाने इटालियन ठरतो. त्यामुळेच काही इतिहासकार सांगतात की, नोपोलियनला फ्रान्समध्ये शिक्षण घेताना सुरुवातीच्या काळात फ्रेंच शिकताना थोडाफार त्रास झाला होता. नेपोलियनची आईसुद्धा फ्रेंच बोलत असताना तिच्या उच्चारांवर इटालियन शब्दांचा प्रभाव असल्याचे जाणवत असे. अशा प्रकारचे मत अनेक अभ्यासकांनी नमूद केले आहे.

नेपोलियनच्या व्यक्तिमत्त्वाचा आपण विचार केल्यास आपल्या असे लक्षात येते की, नेपोलियनची उंची त्यामानाने कमी होती. इतिहासकार असे नमूद करतात की, नेपोलियनची उंची ५ फूट २ इंच एवढी होती. युरोपीयन गोऱ्या वंशांच्या लोकांच्या मानाने ही उंची कमीच मानावी लागेल. अर्थात, त्याकाळात एवढ्या उंचीला फ्रान्समध्ये पुरुषांची सर्वसाधारण उंची मानली जात असे. नेपोलियनच्या समकालीन फ्रेंच सैनिकी अधिकाऱ्यांचा व राजकारण्यांचा विचार केला असता ते उंचीने (शारीरिक) नेपोलियनपेक्षा जास्त उंच होते अशी माहिती आपणास मिळते. नेपोलियनची शारीरिक उंची त्यामानाने कमी असल्याने सैन्यातील इतर अधिकारी व त्याचे सहकारी त्याचा उल्लेख फ्रेंच मध्ये 'ले पेटिट कॅपोरल' (le Petit Caporal) म्हणजेच इंग्रजीमध्ये 'द लिटिल कॉर्पोरल' – The Little Corporal असा करत असत. अर्थात नेपोलियन शारीरिक उंचीने कमी असला तरी, त्याची कर्तृत्वरुपी उंची निश्चितच उत्तुंग पर्वत शिखरासारखी उंच होती हे इतिहासाने सिद्ध केलेले आहे.

नेपोलियन हा एक शूर व लढवय्या सैनिक होता व महत्त्वाचे म्हणजे तो आपल्या सैन्याचे मनोबल वाढविणारा व प्रत्यक्ष लढाई होण्यापूर्वी लढाईविषयक इत्यंभूत रणनीती तयार करणारा, तसाच लढाई दरम्यान उत्तम डावपेच आखणारा उत्कृष्ट सेनापती होता. त्यामुळेच नेपोलियनला त्याच्या काळातील सर्वोत्तम सेनापती म्हटले जात असे! नेपोलियनच्या सैनिकी कौशल्याची प्रचीती त्याने आपल्या शत्रूविरुद्ध विविध लढायांत मिळविलेल्या विजयांवरून येते. अशाच प्रकारचा लढायांमध्ये देदिप्यमान विजय प्राप्त करणारा एक महान राजा प्राचीन काळात भारतात होऊन गेला व त्या राजाचे नाव समुद्रगुप्त असे होते. समुद्रगुप्त हा प्राचीन काळातील गुप्त राजघराण्यातील राजा होता. त्याने आपल्या शत्रूंविरुद्ध रणांगणांवर मिळविलेल्या विजयश्रींमुळे त्याचा उल्लेख 'भारताचा नेपोलियन' असा केला जातो.

नेपोलियन हा एक उत्तम सेनापती तर होताच, परंतु तो एक चांगला राजा व कुशल प्रशासक म्हणून देखील प्रसिद्ध होता. त्याने फ्रान्सची सूत्रे हातात घेतल्यानंतर त्या देशात अनेक सुधारणा घडवून आणून अतिशय सुरेख प्रशासकीय व्यवस्था निर्माण केली. नेपोलियनने त्याच्या कारकिर्दीत ज्या प्रशासकीय सुधारणा केल्या व लोकोभिमुख कार्ये केली त्यासाठी आजही फ्रेंच लोक त्याचे ऋण मानतात. त्याच्या प्रशासकीय व अंतर्गत

दारिद्र्यात लाज वाटण्यासारखे काहीच नसते; परंतु दारिद्र्याची लाज वाटणे हे मात्र खरे दारिद्र्य. – टी. फुलर

सुधारणांविषयीची चर्चा आपण पुढे करणारच आहोत.

लढाई दरम्यान नेपोलियन अनेकदा आपल्या सैनिकांना विस्मयात टाकणारे निर्णय घेत असे व कृती करत असे. अतिशय बाका प्रसंग असतानाही आपल्या अधिकाऱ्यांना व सैनिकांना प्रेरीत करण्याची कला नेपोलियनला अवगत होती. नेपोलियनचे सर्व व्यक्तिमत्त्वच सदासर्वदा ऊर्जेने मुसमुसलेले असे. तो एक अतिशय महत्त्वाकांक्षी सेनापती, राजा व प्रशासक होता. नेपोलियन लढायांदरम्यान राजवाडा व राजधानी सोडून स्वतः रणांगणावर हजर असे. एवढेच नव्हे तर, तो स्वतः शत्रूवर आक्रमण करण्याची व्यूहरचना तयार करत असे व सैनिकांना मार्गदर्शन करून त्यांचे मनोबल व धैर्य वाढवत असे. किंबहुना नेपोलियनच्या अशा गुणांमुळेच फ्रान्सला आपल्या बलाढ्य शत्रूंविरुद्ध नेत्रदीपक व देदिप्यमान विजय मिळवता आले असे म्हणणे वावगे ठरू नये. नेपोलियनची कार्यक्षमता एवढी अफाट व अचाट होती की, फ्रान्समधील वृत्तपत्र, पोलिसयंत्रणा, परराष्ट्र धोरण व देशांतर्गत विविध बाबींचे तो एकहाथी नियंत्रण करत असे. नेपोलियनच्या एकंदरीतच यशाचे गमक म्हणजे त्याने प्रशासकीय व राजकीय कामासाठी निवडलेल्या योग्य व्यक्ती व अधिकारी होत. ह्यावरून एक गोष्ट सिद्ध होते की, नेपोलियनला व्यक्तींच्या गुणांची व त्यांच्या कार्यक्षमतेची अचूक पारख करण्याची जाण होती. नेपोलियन आपल्या अधिकाऱ्यांचा त्यांनी दाखवलेल्या कर्तबगारीसाठी यथायोग्य सन्मान करत असे व त्यांना विविध पदके, संपत्ती, सैनिकी/लष्करी पदे व सरदारकीचे किताब देऊन त्यांचा मान राखत असे. त्यामुळे नेपोलियनचे अधिकारी त्याच्यासोबत एकनिष्ठ राहात असत असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये.

यशस्वीरित्या राज्य करण्यासाठी राजाला एकनिष्ठ व कार्यक्षम व्यक्तींची व अधिकाऱ्यांची फळी निर्माण करणे आवश्यक असते. ह्याबाबतीत नेपोलियन यशस्वी ठरला असे म्हणावयास हरकत नाही. इतिहासात ज्या राजांनी शूर, कार्यक्षम व एकनिष्ठ लोकांची फळी निर्माण केली ते शासक यशस्वी ठरले असे आपल्या निदर्शनास येते. उदाहरणच द्यायचे झाले तर, छत्रपती शिवाजी महाराजांनी मोरोपंत पिंगळे, बाळजी आवजी, हंबीरराव मोहिते, तानाजी मालुसरे, मदारी मेहतर, येसाजी कंक इत्यादी तर श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांनी शिंदे, होळकर इत्यादी घराण्यांतील सरदारांना जवळ करून नव्हे तर त्यांना तयार करून व त्यांच्यावर विश्वास दाखवून अतिशय योग्यरित्या राज्यकारभार केलेला आपल्या निदर्शनास येतो. असो.

अगोदर नमूद केल्याप्रमाणे नेपोलियनचा जन्म १५ ऑगस्ट १७६९ रोजी भूमध्य समुद्रातील कोर्सिका ह्या बेटावरील आजासियो ह्या ठिकाणी झाला होता. फ्रान्सने १७६८ साली कोर्सिका हे भेट जिनोआ ह्या इटालियन राज्याकडून विकत घेतले होते. त्यामुळे नेपोलियन जरी जन्माने व भाषेने इटालियन असला तरी त्याचे राष्ट्रीयत्व फ्रेन्च होते. नेपोलियन हे बोनापार्ट कुटुंबातील चौथे अपत्य होते. नेपोलियनचे वडील कार्लो बोनापार्ट हे पेशाने कोर्सिकामधील वकील होते. नेपोलियनची आई लेटिसिया रामालिनो बोनापार्ट ही दांडगी इच्छाशक्ती असणारी सुंदर स्त्री होती. इसवी सन १७७९ मध्ये नेपोलियनने फ्रान्समधील ब्रिने (Brienne) येथील सैनिकी शाळेत प्रवेश घेतला. शाळेत असताना नेपोलियनला गणित ह्या विषयात विशेष गती होती. गणित वगळता इतर विषयात त्याची प्रगती बेताचीच असे. १७८४ मध्ये पॅरिस मधील एका सैनिकी शिक्षण देणाऱ्या ॲकॅडमीमध्ये नेपोलियनची निवड झाली. १७८५ च्या आसपास नेपोलियनने सैनिकी प्रशिक्षणासह पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले असे म्हटले जाते. १७८५ मध्येच वयाच्या सोळाव्या वर्षी नेपोलियन फ्रेंच सैन्याच्या तोफखाना विभागात द्वितीय लेफ्टनंट (Second Lieutenant) म्हणून

दाखल झाला. १७९१ साली त्याला प्रथम लेफ्टनंट (First Lieutenant) तर १७९२ साली कॅप्टन म्हणून बढती मिळाली. १७९० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात नेपोलियनने आपला बराच काळ त्याच्या कोर्सिका ह्या मायभूमीत व्यतीत केला. नेपालियन फ्रान्समध्ये १७८९ साली सुरू झालेल्या क्रांती दरम्यान जॅकोबीन क्लबचा सदस्य देखील झाला होता. जॅकोबीन क्लबची स्थापना १७८९ मध्ये पॅरिसमध्ये झालेली होती. हा एक प्रकारचा स्वतःची अतिशय जहाल विचारप्रणाली असणारा व आपल्या राजकीय विरोधकांवर अतिशय निर्दयीप्रमाणे कारवाई करणारा राजकीय क्लब वा गट म्हणून प्रसिद्ध होता. रॉबस्पियरच्या सहाय्याने जॅकोबीन क्लबने १७९३ ते १७९४ या कालावधीत आपल्या राजकीय विरोधकांना मृत्यूदंड देऊन त्यांचा ‘गिलोटीन’च्या (शीर धडापासून वेगळे करण्यासाठी फ्रान्समध्ये तयार केलेले यंत्र) सहाय्याने खातमा करण्याची कारवाई वा मोहीम सुरू केली होती. ही मोहीम क्रांतीकालीन (१७८९-१७९९) फ्रान्समधील इतिहासात ‘रेन ऑफ टेरर’ 'Reign of Terror' म्हणून प्रसिद्ध आहे. असो. जॅकोबीन क्लबच्या अनेक सदस्यांना फ्रान्समध्ये प्रजासत्ताकीय लोकशाही प्रस्थापित व्हावी असे वाटत असे. असे म्हटले जाते की,नेपोलियनच्या ‘जॅकोबिन्स’ बरोबरच्या झालेल्या घरोब्यामुळे कोर्सिकाचा तत्कालीन राज्यपाल पास्कल पावली (Pasquale Paoli) व नेपोलियनच्या दरम्यान वितुष्ट आले. याचे कारण, पास्कल पावलीचा फ्रान्समधील राजेशाही प्रकारच्या (Monarchy) शासनाला पाठिंबा होता. पास्कल पावली हा कोर्सिकाचा लढवय्या नेता म्हणून प्रसिद्ध होता. त्याने सुरुवातीच्या काळात कोर्सिकाच्यावतीने जिनोआ विरुद्ध लढा दिला होता. नंतर त्याने फ्रेंच राजसत्तेशी जुळवून घेतलेले आढळते. परंतु नंतर त्याने ब्रिटिशांच्या मदतीने फ्रेचांच्या विरुद्ध देखील बंड केलेले निदर्शनास येते. शेवटी पास्कल पावली १७९५ साली इंग्लंडला गेला व त्याला इंग्लंडच्या सरकारकडून निवृत्तीवेतन मिळू लागले अशी माहिती आपणास मिळते. तर ह्या पास्कल पावलीने १७९३ साली जेव्हा फ्रेंच क्रांतिकारकांनी बुरबाँ राजघराण्याचा राजा सोळावा लुई यास देहदंड दिला तेव्हा पास्कल पावलीने बोनापार्ट कुटुंबाला हद्दपार केले. त्यामुळे मूळच्या कोर्सिकाच्या असणाऱ्या बोनापार्ट कुटुंबाने फ्रान्समध्ये पळ काढला व तेथे नेपोलियन फ्रेंच सैन्यात पुन्हा एकदा रुजू झाला.

इसवी सन १७९३ हे वर्ष नेपोलियनच्या एकंदरीतच कारकिर्दीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरले असे म्हणणे वावगे ठरू नये. याचे कारण ह्या वर्षी म्हणजेच १७९३च्या जून महिन्यात मॅक्सीमिलियन रॉबस्पियर (Maximilien Robespierre) याच्या नेतृत्वाखाली जॅकोबिन्सनी क्रांतीकालीन फ्रान्समधील सत्ता काबीज/ हस्तगत केली. जेव्हा जॅकोबिन्स सत्तेवर आले तेव्हा फ्रान्समधील अनेक शहरांमध्ये ह्या नवीन शासनाविरुद्ध बंड झाले. अशाच एका शहरांपैकी एक ट्युलॉन (Toulon) हे एक शहर होते. ट्युलॉन हे दक्षिण फ्रान्समधील भूमध्य सागराच्या किनाऱ्यावरील वसलेले शहर (बंदर) होय. येथे बंडकर्त्यांना ब्रिटिश आरमाराने मदत केलेली निदर्शनास येते. त्यामुळे ट्युलॉन येथे ब्रिटिश नौदलाचा पाठिंबा असणारे फ्रेंच बंडकर्ते व फ्रेंच सैन्यामध्ये घमासाम वा तुंबळ संघर्ष झालेला आढळतो. ह्या सैनिकी संघर्षात फ्रेंचांच्या तोफखाना विभागाचा प्रमुख जबर जखमी झाल्याने त्याच्या जागेवर नेपोलियनची नेमणूक करण्यात आली होती. नेपोलियनने आपल्यात उपजतच असलेल्या लढाऊ बाण्याचे व युद्ध कौशल्याचे लिलया प्रदर्शन करून ब्रिटिश आरमारावर तोफांचा जोरदार मारा केला. त्यासाठी त्याने आपल्या तोफा उंचावर (टेकड्यांवर) प्रतिष्ठापीत (Positoined) केल्या होत्या असे इतिहासकार म्हणतात. अर्थात नेपोलियनच्या तोफांच्या ह्या भडिमारासमोर ब्रिटिश आरमाराचा टिकाव लागला नाही व त्यांच्या नौकांना

माघार घ्यावी लागली. यामुळे ट्युलॉन शहराचा पूर्ण ताबा फ्रेंच सरकारकडे येण्यास मदत झाली. ट्युलॉन येथील बंड मोडून काढण्याच्या नेपोलियनच्या ह्या कामगिरीमुळे वयाच्या २४ व्या वर्षी त्याची ब्रिगेडियर जनरल (Brigadier Ganeral) म्हणून सैन्यात बढती झाली.

मात्र, जुलै १७९४ मध्ये रॉबस्पियरची सत्ता संपुष्टात आली व नेपोलियनच्या कारकिर्दीस व जीवनास तात्पुरत्या स्वरूपात का होईना परंतु निश्चितपणे खीळ बसली. आतापर्यंत त्याला ब्रिगेडियर जनरल ह्या पदापर्यंत नेणाऱ्या नियतीने व नशिबाने काही काळ का होईना पण त्याच्याकडे पाठ फिरविली होती. कारण जुलै १७९४ मध्ये रॉबस्पियरची फ्रान्समधील फक्त सत्ताच संपुष्टात आली नाही, तर त्याची 'गिलोटीन'च्या द्वारे हत्यादेखील करण्यात आली. ह्याच काळात नेपोलियनला काही काळ कारावासात देखील जावे लागले. जवळपास एक आठवडा तुरुंगात राहिल्यानंतर नेपोलियन पुन्हा एकदा सैन्यातील नोकरीवर रुजू झाला असे अभ्यासक म्हणतात. १७९५ मध्ये नेपोलियन पॅरिसमध्ये असताना प्रक्षुब्ध जमावाने फ्रान्सवर त्यावेळी शासन करणाऱ्या नॅशनल कन्व्हेशन (National Convention) वर ट्वीलरीज् (Tuileries) राजवाड्यात हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. येथे सांगावेसे वाटते की, ट्यूलरीज् (Tuileries) वा ट्वीलरीज् हा पॅरिस शहरातील सेन (Seine) ह्या नदीच्या उजवीकडील तीरावर बांधलेला राजवाडा होता. १७८९ साली फ्रान्समध्ये जेव्हा क्रांतीला सुरुवात झाली तेव्हा क्रांतीकारी जनतेने सोळाव्या लुईला व त्याच्या कुटुंबीयांना व्हर्सायच्या (Versailles) राजवाड्यातून बाहेर काढून ट्वीलरीज्च्या राजवाड्यात ठेवले होते. १७८९ साली फ्रान्समध्ये क्रांतीची सुरुवात झाल्यानंतर फ्रान्सचा तत्कालीन राजा बुरबाँ (Burbon) घराण्यातील सोळावा लुई यास पदच्युत करण्यात आले. त्यानंतर फ्रान्समध्ये कोणत्या प्रकारचे शासन वा शासन यंत्रणा असावी याबाबत चर्चेला सुरुवात झाली. ह्याच पार्श्वभूमीवर क्रांतीकालीन फ्रान्समध्ये २१ सप्टेंबर १७९२ रोजी अस्तित्वात आलेल्या नॅशनल कन्व्हेन्शनने फ्रान्सला प्रजासत्ताक म्हणून घोषित केले व नव्याने निर्माण झालेल्या फ्रेंच प्रजासत्ताकाचे ब्रीद 'स्वातंत्र्य, समता व विश्वबंधूत्व' – Liberty, Equality and Fraternity असेल अशी घोषणा केली. याच काळात सोळाव्या लुईवर देशद्रोहाचा खटला चालविण्यात आला व नॅशनल कन्व्हेन्शनने त्याच्या देशद्रोही कारवायांना दुजोरा देऊन त्याला त्यासाठी मृत्यूदंडाची शिक्षा ठोठावली व सोळाव्या लुईला २१ जानेवारी १७७३ रोजी 'गिलोटीन' च्या द्वारे ठार करण्यात आले. असो. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, १७९५ मध्ये पॅरिसमधील जमावाने ट्वीलरीज् राजवाड्यात नॅशनल कन्व्हेन्शनवर हल्ला केला. या हल्ल्यामागे राजेशाही स्वरूपाच्या शासन व्यवस्थेच्या (Monarchy) समर्थकांचा हात होता असे अभ्यासकांचे मत आहे. ट्वीलरीज् राजवाड्यावर पॅरिसमधील जमावाने जेव्हा हा हल्ला केला तेव्हा व्हिकोम्ट पॉल डी बारासचे (Vicomete Paul de Barras) सैन्य राजवाड्याचे रक्षण करत होते. ह्या बारासला नेपोलियनने कशाप्रकारे अद्वितीय शौर्याचे दर्शन घडवून ट्यूलॉन बंदराचे रक्षण केले होते हे माहीत होते. त्यामुळेच नेपोलियनला टीलरीज् राजवाड्याचे प्रक्षुब्ध जमावापासून रक्षण करण्यासाठी पाचारण करण्यात आले. ह्यावरून नेपोलियनच्या अनन्यसाधारण सैनिकी कौशल्याचे व शौर्याचे दर्शन घडते. तसेच नेपोलियनच्या शौर्याच्या गाथा फ्रान्समधील उच्च राजकीय वर्तुळात म्हणजेच राज्यकर्त्यांपर्यंत १७९५ पर्यंत पोहोचल्या होत्या हेदेखील जाणवते.

नेपोलियनने ट्वीलरीज राजवाड्याचे हिंसक जमावापासून आपल्या सैन्याच्या मदतीने लीलया रक्षण केले. यावेळी तोफांचा मारा करून नेपोलियनने शेकडो लोकांना कंठस्नान घातले व अनेकजण जखमी झाले.

ज्यामुळे माझे मन निर्मळ आणि सामर्थ होते, तेच खरे काव्य. – इमरसन

याचा परिणाम असा झाला की, हिंसक जमावाला राजवाड्याजवळून पांगवण्यात यश आले. अशा तऱ्हेने नेपोलियनने नॅशनल कन्व्हेशनचे रक्षण केल्यामुळे तो राज्यकर्त्यांच्या व प्रामुख्याने बारासच्या नजरेत भरला. त्याचप्रमाणे ह्या घटनेनंतर नेपोलियनची मेजर जनरल म्हणून बढती झाली. काही काळानंतर फ्रान्समध्ये 'डिरेक्टरीं'चे सरकार स्थापन झाले वा अस्तित्वात आले. ह्या डिरेक्टरींमध्ये तीन डायरेक्टर होते. ह्या तीन डायरेक्टर्सपैकी एक स्वतः बारास होता.

१७९६ साली नेपोलियनने जोसेफाईन ब्युहॅारनेस (Josephine Beauharnais) ह्या फ्रेंच विधवेशी विवाह केला. जोसेफाईनच्या पहिल्या पतीचे नाव व्हिकोम्ट अलेक्झांड्रे डि ब्युहॅारनेस (Alexandre de Beauharnais) हे होते. त्याला 'रेन ऑफ टेटर' च्या दरम्यान गिलोटिनच्या सहाय्याने ठार करण्यात आले होते. नेपोलियन, जोसेफाईनपेक्षा जवळ जवळ सहा वर्षांनी लहान होता. जोसेफाईनला तिच्या पहिल्या पतीपासून झालेली दोन अपत्ये होती.

फ्रान्समध्ये जेव्हा १७८९ साली बुरबाँ राजघराण्याच्या राजवटीच्या विरोधात क्रांतीला सुरुवात झाली तेव्हापासून युरोपमधल्या ऑस्ट्रीया, इंग्लंड इत्यादी देशांनी फ्रान्सविरुद्ध गट तयार करून (आघाड्या करून) फ्रान्सवर आक्रमण करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे १७९२ ते १७९५ ह्या कालावधीत फ्रान्स बहुतांशवेळा युरोपमधील विविध देशांसोबत लढण्यात गुंतलेला होता. १७९६ पर्यंत तर मध्य युरोपातील ऑस्ट्रीया हा देश फ्रान्सचा मुख्य शत्रू बनला होता. ह्याकाळात नेपोलियनने फ्रान्सच्या वतीने इटलीमध्ये मोठ्या सैनिकी विजयाची नोंद केलेली आढळते. जोसेफाईन बरोबर विवाह झाल्याबरोबर काही दिवसांतच नेपोलियनला पॅरिस सोडून रणांगणावर जावे लागले. नेपोलियनची ही इटलीवरची मोहीम (१७९६-९७) होती. इतिहासकार म्हणतात की, ज्यांच्याकडे शत्रूच्या तुलनेत अतिशय निकृष्ट दर्जाची शस्त्रास्त्रे होती व ज्यांना व्यवस्थित जेवण देखील मिळत नव्हते अशा ३८,००० फ्रेंच सैन्याचे नेतृत्व करण्यासाठी नेपोलियनला जावे लागले. इटलीमध्ये, प्रामुख्याने उत्तर इटलीमध्ये ऑस्ट्रीयाने फ्रान्ससाठी डोकेदुखी करून ठेवली होती. त्यामुळे नेपोलियनची ही इटलीची मोहीम इटलीत डेरा घालून बसलेल्या ऑस्ट्रीयन सैन्याविरुद्ध होती. फ्रान्सच्या 'डिरेक्टरी'चे असे मनसुबे होते वा योजना होती की, नेपोलियन 'आल्प्स्'च्या पर्वत रांगा ओलांडून उत्तर इटलीत शिरेल व तेथे ऑस्ट्रीयन सैन्याला युद्धात गुंतवून ठेवील व याचा फायदा घेऊन फ्रान्सच्या सैन्याच्या दुसऱ्या तुकड्या जर्मनीतून ऑस्ट्रीयात घुसतील व ऑस्ट्रीयाची राजधानी 'व्हिएन्ना' ह्या शहरावर हल्ला चढवतील. यावरून असे लक्षात येते की, या खेपेस फ्रान्सने ऑस्ट्रीयाला चांगलाच धडा शिकविण्याचा मनसूबा रचलेला होता. मात्र, नेपोलियनने उत्तर इटलीत ऑस्ट्रीयन व सार्डिनियन (Sardinian) सैन्याचा पूर्णतः पाडाव/पराभव केला व ऑस्ट्रीयाला 'कॅम्पो फॉर्मियो' (Campo Formio) चा तह करण्यास भाग पाडले. त्याचप्रमाणे ऑस्ट्रीयाने उत्तर इटलीतील लोम्बार्डी (Lomardy) ह्या प्रांतावरील आपला हक्कदेखील सोडून दिला. याचाच अर्थ नेपोलियनने उत्तर इटलीतून ऑस्ट्रीयन सैन्याला हुसकावून तर लावलेच; मात्र हा प्रदेश खऱ्या अर्थाने ऑस्ट्रीयापासून मुक्त केला व येथे 'सिस्अल्पाईन' प्रजासत्ताकाची (Cisalpine) स्थापना केली. हे प्रजासत्ताक (१७९७ ते १८०२) फ्रान्सच्या सार्वभौमत्वाखाली होते. ऑस्ट्रीयाच्या ह्या पराभवानंतर १७९३ साली ऑस्ट्रीया, पर्शिया, इंग्लंड, हॉलंड, स्पेन, सार्डिनिया व इंग्लंड या देशांनी फ्रान्सविरुद्ध स्थापन केलेला गट वा आघाडी (युती) संपुष्टात आली. आता फक्त इंग्लंडच फ्रान्सचा विरोध करत होते व ह्या गटातील अगोदर नमूद केलेल्या इतर राष्ट्रांनी फ्रान्ससमोर नांग्या टाकल्या होत्या.

काव्य हे फेसाप्रमाणे नवे असावे आणि खडकाप्रमाणे जुने असावे. - इमरसन

नेपोलियनने इटलीच्या मोहीमेत नेत्रदीपक यश मिळवून फ्रान्सच्या शत्रूंचा बंदोबस्त केला होता. १७९७ साली 'डिरेक्टरी'ने नेपोलियनला इंग्लंडवर हल्ला करावा अशी सुचना केली. परंतु नेपोलयिन हा अतिशय चाणाक्ष व मुरलेला सेनापती होता. त्याला आपले युद्धाचे डावपेच कसे आखावेत व शत्रूला हरविण्यासाठी खिंडीत कसे पकडावे हे चांगल्या परीने ठाऊक होते. त्यामुळेच त्याने इंग्लंडवर थेट हल्ला करण्याऐवजी इंग्लंडचे जागतिक व्यापारातील वर्चस्व मोडून काढून वा संपुष्टात आणून इंग्लंडला जेरीस आणणे योग्य ठरेल असे मत मांडले. यातूनच इंग्लंडचा मध्य-पूर्वेशी (अरेबिया) चालत असलेला व्यापार धोक्यात आणावा असे नेपालियनने ठरविले. यामुळेच इजिप्तच्या मोहीमेची (१७९७) आखणी व तयारी झाली. नेपालियनला ठाऊक होते की, इंग्लंडची व्यापारी वा मालवाहू गलबते/जहाजे भूमध्य सागराच्या मार्गाने इजिप्तच्या बंदरात माल घेऊन येतात व तेथून तो माल अरेबियात (मध्य-पूर्व) जातो व अरेबियातून तोच माल भारत व इतर पूर्व देशांतदेखील नेणे सुकर होते. (अरबी समुद्र व हिंद महासागरातून). तसेच अरेबियात पूर्वेकडून आलेला माल इजिप्तच्या बंदरांत आणला जाऊन तो जहाजांवर लादून इंग्लंड व युरोपमधील इतर देशांमध्ये घेऊन जाता येतो. इंग्लंडची खरी ताकद ही त्या देशाची मजबूत आर्थिक स्थिती होय ही बाब नेपोलियनच्या लक्षात आली होती व इंग्लंडच्या सदृढ आर्थिक स्थितीचे गमक त्या देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात आहे हे देखील नेपोलियनने ओळखले होते. त्यामुळेच असे म्हटले जाते की, नेपालियन हा इंग्लंडची संभावना 'Nation of Shopkeepers' (दुकानदारांचा देश) अशी करत असे. असो. तर नेपोलियनने इंग्लंडच्या आर्थिक बलस्थानाला धक्का देण्याचे ठरविले व यातूनच १७९७ च्या इजिप्तच्या मोहीमेची आखणी झाली. नेपोलियन फ्रान्सच्या दक्षिणेकडील समुद्र किनाऱ्यावरून भूमध्यसागर पार करून इजिप्तच्या उत्तर किनाऱ्यावर उतरला व त्याच्या इजिप्तच्या मोहीमेची सुरुवात झाली. ह्या मोहीमेवर सुद्धा नेपोलियनने आपल्यासोबत ३८,००० सैनिक घेतले होते असे इतिहासकार म्हणतात. नेपोलियन इजिप्तमध्ये १७९८ मध्ये 'पिरॅमिडची लढाई' (Battle of Pyramid -1798) लढला. त्याने ह्या लढाईत इजिप्तच्या मामेलूक तुर्क वंशाच्या शासकांचा पराभव केला. परंतु नाईलच्या लढाईमध्ये (Battle of Nile) फ्रेंच आरमाराचा ब्रिटिश आरमाराने ब्रिटिश ॲडमिरल होरॅशिओ नेल्सन (Horatio Nelson) याच्या नेतृत्वाखाली पाडाव केला. नेपोलियनने इजिप्तमधून तुर्कस्तानच्या अरेबियातील प्रदेशांवर देखील हल्ला केला. परंतु तो सिरीयातील 'ॲकर'चा (Acre) किल्ला जिंकू शकला नाही. सध्या ह्या किल्ल्याला ॲक्को (Akko) असे म्हटले जाते व तो इस्त्रायलमध्ये आहे. ह्यावेळी नेपोलियनविरुद्ध म्हणजेच फ्रान्सविरुद्ध इंग्लंडच्या सोबत तुर्कस्तान व रशियाने हात मिळवणी केली व फ्रान्सविरुद्ध संयुक्त आघाडी उघडली. याचवेळी ऑस्ट्रीयादेखील फ्रान्सविरोधी आघाडीमध्ये सामील झाला व फ्रेंच सैन्याचा इटलीमध्ये पराभव झाला. युरोपमधील ह्या घडामोडींमुळे नेपोलियनने आपली इजिप्त व मध्यपूर्वेतील मोहीम अर्धवटच सोडून मायदेशी म्हणजेच फ्रान्सला परतण्याचा निर्णय घेतला. नेपोलियनने सेनापती जॉन क्लेबर (Jean Kleber) याच्याकडे इजिप्तमधील फ्रेंच सैन्याचे नेतृत्व सोपविले व तो स्वतः फ्रान्सकडे रवाना झाला.

इकडे फ्रान्समध्ये नेपोलियनने इजिप्त व मध्यपूर्वेत मारलेल्या मुसंडीमुळे त्याची लोकप्रियता व कीर्ती वाढलेली होती. नेपोलियनने या अगोदर इटलीची मोहीम यशस्वी करून दाखविलेलीच होती. त्यामुळे नेपालियनच्या शौर्याच्या गाथा व स्तुती फ्रान्सच्या घराघरामध्ये गायिली जात होती असे म्हणणे वावगे ठरू नये. तसेच हळूहळू फ्रेंच जनता 'डिरेक्टरी'च्या कारभारावर नाराज होत चालली होती. याचा फायदा नेपोलियनने उचलण्याचे ठरविले व

ॲबे सेयस (Abbe Sieyes) ह्या एका 'डिरेक्टर' सोबत संगनमत करून ९ व १० नोव्हेंबर १७९९ रोजी सैनिकी बळाचा वापर करून आकस्मिक शासन परिवर्तन (Coup d'etat) घडवून आणले व 'डिरेक्टरी' ची फ्रान्समधील सत्ता संतुष्टात आणली. सर्व 'डिरेक्टर्स'ना नेपालियनने राजीनामा देण्यास भाग पाडले व फ्रान्समध्ये नवीन शासनाची वा सत्तेची स्थापना करण्यात आली. १७९९ मध्ये नेपोलियन स्थापित ह्या नवीन शासनाला 'कॉन्सुलेट' (Consulate) असे म्हटले गेले. ह्या 'कॉन्सुलेट'मध्ये तीन कॉन्सुल (Consul) होते. हे तीन कॉन्सुल म्हणजे ॲबे सेयस (Abbe Sieyes) पेयर-रॉजर ड्युका (Pierre-Rojer Ducos) व अर्थात नेपोलियन हे होते. ह्या तिघांमध्ये वा तिघांपैकी नेपालियनकडे खऱ्या अर्थाने फ्रान्सचा राज्यकारभार चालविण्याची सत्ता होती. त्यामुळेच त्याला फर्स्ट कॉन्सुल (First Consul) असे म्हटले गेले. येथे एक बाब नमूद करणे महत्त्वाचे आहे व ती म्हणजे ॲबे सेयस व पेयर-रॉजर ड्युका हे दोन कॉन्सुल 'डिरेक्टरी'च्या काळात दोन 'डिरेक्टर्स' देखील होते. याचा अर्थ असा होतो की, १७९९ साली नेपोलियनने एका अर्थाने केलेले बंड हे डिरेक्टरीमधील पॉल बारास (Paul Barass) याच्या विरोधात होते. बारासविषयी सांगावयाचे झाल्यास त्याचा जन्म दक्षिण फ्रान्समधील प्रोव्हेन्स् (Provence) ह्या प्रांतातील फॉक्स-ॲम्फॉक्स (Fox-Amphoux) ह्या गावी ३० जून १७५५ साली झाला होता. बारासचा राजकीय प्रवासदेखील अतिशय रंजक होता. त्याने जॅकोबिन क्लबचे सदस्यत्व देखील घेतले होते असे आपणास आढळते. त्याचप्रमाणे तो नॅशनल कन्व्हेन्शनचा देखील सदस्य होता. १७८९ च्या क्रांतीनंतर जेव्हा सोळाव्या लुईला (Louis XVI) मृत्यूदंड देण्याचे ठरविण्यात आले तेव्हा बारासने आपले मत मृत्यूदंडाच्या बाजूनेच नोंदविले. जेव्हा दक्षिण फ्रान्समधील ट्युलॉन (Toulon) बंदरामध्ये जॅकोबिन्सच्या (Jacobins) विरोधात बंड झाले तेव्हा बारास तेथील मोहिमेवर गेला होता व तेथेच त्याची नेपोलियनशी पहिल्यांदा गाठ पडली होती. जेव्हा १७९४ मध्ये रॉबस्पियरचा (Robespierre) चा खातमा २८ जुलै १७९४ करण्याचा ठरले तेव्हा बारासदेखील त्या कटातील एक प्रमुख म्होरक्या होता. त्यानंतर बारास फ्रान्सच्या अंतर्गत सैन्याचा व पोलिस यंत्रणेचा प्रमुख बनला. बारास नॅशनल कन्व्हेन्शन्चा देखील सदस्य होता. तसेच १७९४-९५ मध्ये काही काळात 'कमिटी ऑफ पब्लिक सेफ्टीचा' (Committee of Public Safety) देखील सदस्य होता. नेपोलियनचा ज्या जोसेफाईनबरोबर नंतर विवाह झाला तिच्यासोबत ह्या काळात बारासचे प्रेमसंबंध होते असे म्हटले जाते. मात्र, नेपोलियनने नोव्हेंबर १७९९ साली जेव्हा कॉन्सुलेटची स्थापना केली तेव्हा बारासला त्यात कुठलेही स्थान नव्हते व त्यानंतर त्याच्यावरची नेपोलियनची मर्जी कमी झाली. तसेच फ्रान्समधील गुप्त पोलिस सततपणे त्याच्यावर पाळत ठेवून असत. नेपोलियनला नेहमीच बारास आपल्याविरुद्ध काही कट वा षडयंत्र तर करत नाही ना असे वाटत असे. त्यामुळेच १८०१ ते १८०५ ह्या काळात बारासला हद्दपार करण्यात आले व त्याने हा काळ व बेल्जियमची राजधानी ब्रसेल्स् (Brusells) येथे घालवला. त्यानंतर त्याला फ्रान्समध्ये परत येण्याची मुभा देण्यात आली व तो दक्षिण फ्रान्समध्ये परतला. नेपोलियनला जेव्हा कळले की, बारास चौथ्या चार्ल्स (Charles IV) ह्या स्पेनच्या भूतपूर्व राजाबरोबर गुप्त बैठका घेऊन काही खलबत करत आहे तेव्हा नेपोलियनने बारासला १८१३ मध्ये रोमला पाठवून दिले. १८१५ नंतर नेपोलियनचा पाडाव झाल्यावर जेव्हा बुरबाँ घराण्यातील अठरावा लुई (Louis XVIII) फ्रान्सचा राजा बनला तेव्हा त्याने बारासला पॅरिसमधील आपल्या 'चॅलट' (Chaillot) येथील इस्टेटीवर शांतपणे राहण्याची मुभा वा अनुमती दिली. बारासचे जीवनचरित्र १८९५-९६ साली प्रसिद्ध झालेले आपल्या निदर्शनास येते. शेवटी २९ जानेवारी १८२९ रोजी बारासचा पॅरिस येथे मृत्यू

---

महान सत्ये ज्यांना जाणवतात आणि जे ही सत्ये प्रेमापोटी बोलून दाखवतात, तेच खरे कवी.
कवी म्हणजे आत्म्याचे चित्र रेखाटणारा चित्रकार. - डिस्रायली

झाला. तर ही होती बारासची संक्षिप्त गाथा. असो.

फ्रान्समध्ये 'कॉन्सुलेट'ची स्थापना केल्यावर नेपोलियनने प्रथम कॉन्सुल (First Consule) या नात्याने देशांतर्गत शांतता प्रस्थापित करून शांततापूर्वक परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी करण्याचे ठरविले. त्याचप्रमाणे त्याने ला वेन्डी (La Vendee) ह्या शहरातील व ब्रिटनी (Britanny) ह्या प्रांतातील (ब्रिटनी हा प्रांत वायव्य फ्रान्समध्ये अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यालगतचा प्रांत आहे) बंड मोडून काढले. त्याचप्रमाणे नेपोलियनने आपल्या 'कॉन्सुल'च्या कारकिर्दीत फ्रान्सची आर्थिक स्थिती देखील सदृढ केली व लोकांना धार्मिक स्वातंत्र्य बहाल केले. मे १८०० मध्ये नेपोलियनने आल्प्स्‌च्या पर्वतरांगा ओलांडून पुन्हा एकदा उत्तर इटलीमध्ये आपल्या सैन्यासह प्रवेश केला व तो 'पो खोऱ्यात' (Po Valley) दाखल झाला व ऑस्ट्रीयन सैन्याचा मॅरेंगोच्या लढाईत (Battle of Marengo) पराभव केला. यानंतर १८०१ मध्ये ऑस्ट्रीयाने फ्रान्ससोबत ल्यूनविलचा तह (Treaty of Luneville) केला व अगोदर झालेल्या कॅम्पे फोर्मियोच्या (Campo Formio) तहाला मान्यता / मंजुरी दिली. त्याचप्रमाणे एका अर्थाने फ्रान्सचा नंबर एकचा शत्रू असलेल्या इंग्लंड ह्या देशासोबत देखील १८०२ मध्ये 'अमेन्सचा तह' (Treaty of Amiens) नेपोलियनने केला व ह्या दोन देशांमध्ये शांतता प्रस्थापित झाली. नेपोलियनने फ्रान्समध्ये मोठ्या प्रमाणात प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या. तसेच त्याला नेत्रदीपक असे लष्करी यश मिळाले. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या बाबतीत देखील त्याने दूरदृष्टी व राजकीय मुत्सद्देगिरी दाखविली. त्यामुळे नेपोलियन फ्रेंच जनतेमध्ये अगदी अल्पावधीत लोकप्रिय झाला व एका अर्थाने फ्रेंच जनता त्याला आपला 'मसीहा' मानायला लागली व यात तथ्यही होते यात वाद नाही. त्यामुळेच फ्रेंच जनतेने नेपोलियन फ्रान्सचा आजन्म फर्स्ट कॉन्सुल राहील अशा आशयाच्या १८०२ साली झालेल्या घटना दुरुस्तीला पाठिंबा दिला. त्याचप्रमाणे १८०४ साली जेव्हा नेपोलियनने स्वतःला फ्रान्सचा सम्राट (राजा) म्हणून घोषित केले तेव्हा देखील फ्रेंच जनतेने अतिशय आनंदाने त्याचा आपला सम्राट म्हणून स्वीकार केला. ह्या दोन घटनांवरून नेपोलियन फ्रेंच जनतेमध्ये किती मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होता याची प्रचीती येते.

नेपोलियनने फ्रान्समध्ये आपली सत्ता प्रस्थापित केल्यानंतर फ्रान्सच्या साम्राज्याचा मोठ्या प्रमाणात विस्तार करण्याचा ठरविले. सुरुवातीच्या काळात तरी नेपोलियनची साम्राज्य विस्ताराची महत्त्वाकांक्षा फक्त युरोपपुरतीच मर्यादित नव्हती. त्याचे लक्ष पश्चिम गोलार्धातील नव्या जगाकडे म्हणजेच अमेरिकेकडे देखील होते. त्याला उत्तर अमेरिकेतील (सध्याची अमेरिकेची संयुक्त संस्थाने) प्रदेशांवरदेखील आपली सत्ता प्रस्थापित करण्याची मनीषा होती. त्यामुळेच त्याने १८०० साली स्पेनला उत्तर अमेरिकेतील ल्युसियाना (Louisiana) हा प्रदेश फ्रान्सला देण्यास भाग पाडले. ल्युसियाना हे सध्याचे अमेरिकेतील (United States of America) एक राज्य होय व बॅटन रोग (Baton Rouge) हे शहर ह्या राज्याची राजधानी होय व न्यू ऑर्लियन्स (New Orleans) हे ह्या राज्यातील सध्याचे सर्वात मोठे शहर होय. २००५ साली अमेरिकेतील ल्युसियानासह दक्षिणेतील इतर राज्यांना 'कॅटरिना' (Katrina) ह्या समुद्री वादळाने झोडपून काढले होते व यात मोठ्या प्रमाणात मनुष्य-हानी झाली होती. असो. तर नेपोलियनने फ्रान्सकडून ल्सुसियाना हा प्रदेश घेतला, परंतु जे फ्रेंच सैन्य ल्युसियानाचा ताबा घेण्यासाठी गेले त्या सैन्याविरोधात मध्य अमेरिकेतील हैती (Haiti सध्याच्या मध्य अमेरिकेतील एक स्वतंत्र देश) येथे गुलामांचे बंड झाले. तसेच येथे उष्णकटीबंधातील अनेक रोगराईंना फ्रेंच सैन्य बळी पडले व अनेक सैनिकांचा मृत्यू झाला. त्यामुळे

अंतरीची तळमळ आणि गाढ द्रष्टेपणा यांच्यामुळे माणूस कवी होतो. - कार्लाइल

नेपोलियनने ल्युसियानाचा प्रदेश अमेरिकेला (अमेरिकेची संयुक्त संस्थाने – United States of America) विकून टाकला. ल्युसियाना अमेरिकेला विकण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे अटलांन्टिक महासागरा पलीकडील हा अति दूरचा प्रदेश नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी फ्रान्सला भविष्यात त्रास होऊ शकतो असा विचार नेपोलियनच्या मनात आला असावा. त्यामुळे त्याने हा निर्णय घेतला असावा. त्याचप्रमाणे नेपालियनला फ्रान्सचा क्रमांक एकचा शत्रू इंग्लंडबरोबर युद्ध करण्यासाठी लष्करी तयारी करण्यासाठी पैशाची आवश्यकता होती. त्यामुळे देखील नेपोलियनने ल्युसियाना हा प्रांत अमेरिकेला विकून टाकण्याचा निर्णय घेतला. अशा तऱ्हेने पश्चिम गोलार्धात फ्रान्सच्या साम्राज्याचा विस्तार करण्यास कठीण जाईल ही बाब लक्षात आल्यावर नेपोलियनने अमेरिका खंडात साम्राज्य विस्तार करण्याचा विचार सोडून दिला व त्याने आपला मोर्चा युरोपकडे वळवला. यातूनच पुढे युरोपच्या भूमीवर अनेक लढाया व युद्धे लढली गेली. फ्रान्सविरुद्ध म्हणजेच नेपोलियनविरुद्ध युरोपातील अनेक देशांनी संयुक्त आघाड्या उघडल्या. अर्थात यात इंग्लंड सर्वात जास्त सक्रीय होते व सरतेशेवटी ह्या सर्वांची परिणती नेपोलियनचा पाडाव होण्यात झाली. अर्थात, हा सगळा इतिहास आपण पुढे पाहणारच आहोत.

स्वतःला फ्रान्सचा राजा घोषित करण्याअगोदरच १८०३ सालापासून नेपोलियनचा फ्रान्स व इंगलंड या दोन देशांमधील वाद उफाळून यायला सुरुवात झाली होती व ह्या दोन देशांदरम्यान युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. इतिहासकारांचे म्हणणे आहे की, याला नेपोलियनच कारणीभूत होता. नेपोलियनने भारत, आफ्रिका व अमेरिकेतील आपल्या ब्रिटिश विरोधी कारवायांनी इंग्लंडला खिजवले होते. त्याचप्रमाणे १८०२ च्या अमेन्सच्या तहाचे (Treaty of Amiens) उल्लंघन करून नेपोलियन थेट इंग्लंडवर हल्ला करण्याची योजना बनवत/आखत होता. नेपोलियनच्या ह्या युद्ध धोरणाचा वा निर्णयाचा भाग म्हणूनच ब्रिटिश व फ्रेंच आरमार जवळ जवळ अठरा महिने एकमेकांविरुद्ध लढत होते. परंतु नंतर नेपोलियननेच इंग्लंडवर हल्ला करण्याचा नाद सोडून दिला. कारण इतिहासकार म्हणतात की, त्याला आपली इंग्लंडवरची स्वारी यशस्वी होईल की नाही याबाबत शंका होती. मात्र, नेपोलियनने इंग्लंडला डिवचून फार मोठी चूक केली होती असे म्हणणे वावगे ठरणार नाही. याचे कारण असे की, यानंतर इंग्लंडने सततपणे नेपोलियन व फ्रान्सविरुद्धच्या आपल्या कारवाया चालू ठेवून फ्रान्सविरुद्ध युरोपमधील इतर देशांच्या आघाड्या उभारलेल्या निदर्शनास येते. एवढेच नव्हे तर, शेवटी नेपोलियनच्या पाडावास देखील इंग्लंडच कारणीभूत ठरले. नेपोलियनने उभ्या केलेल्या आव्हानाला तोंड देण्यासाठी इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान विल्यम पिट द यंगर (William Pitt the Younger) यांनी १८०५ साली फ्रान्सविरुद्ध इंग्लंड, ऑस्ट्रीया व रशिया ह्या देशांची आघाडी उघडली. ह्या आघाडीला इंग्लंडविरुद्धची तिसरी आघाडी (युती) (Third Coalition) असे म्हणतात वा म्हटले गेले. ह्या तिसऱ्या आघाडीला वा युतीला स्कॅन्डिनेव्हियातील (Scandinavia हा उत्तर युरोपमधील एक भौगोलिक भाग आहे. ह्या भौगोलिक प्रदेशात नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, फिनलंड व आइसलंड ह्या देशांचा समावेश होतो.) स्वीडन या देशाचा देखील पाठिंबा होता. २१ ऑक्टोबर १८०५ हा दिवस इंग्लंडच्या इतिहासातील अनेक महत्त्वाच्या दिवसांपैकी एक म्हणावा लागेल. कारण ह्या दिवशी विस्काऊँट होरॅशिओ नेल्सन (Viscount Horatio Nelson) ह्या ब्रिटिश ॲडमिरलने फ्रान्स व स्पेनच्या संयुक्त आरमाराचा ट्रॅफलगारच्या लढाईत (Battle of Trafalgar) धुव्वा उडवला. ह्या लढाईचे वैशिष्ट्य म्हणजे ब्रिटिश आरमाराच्या ताफ्यातील सत्तावीस युद्धनौकांच्या सहाय्याने नेल्सनने फ्रेंच व स्पॅनिश आरमाराच्या ताफ्यातील तेहतीस युद्ध नौकांचा पराभव

केला. ही समुद्र लढाई नैऋत्य स्पेनच्या अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील लॉस कॅनॉस डी मेका (Los Canos de Meca) ह्या शहराच्या लगत असलेल्या केप ट्रॅफलगार (Cape Trafalgar) ह्या भूशीरासारख्या जमीनीच्या तुकड्या शेजारी समुद्रामध्ये झाली. त्यामुळेच ह्या लढाईला ट्रॅफलगारची लढाई असे म्हटले जाते. ह्या लढाईत होरॅशिओ नेल्सनच्या नेतृत्वाखाली इंग्लंडला विजय तर प्राप्त झाला, परंतु स्वतः नेल्सनला या लढाईत प्राण गमवावा लागला. ट्रॅफलगारच्या लढाईपूर्वी नेल्सनने काढलेले उद्‌गार फार प्रसिद्ध आहेत. हे उद्‌गार पुढीलप्रमाणे आहेत – 'England expects that every man will do his duty' ह्या इंग्रजी वाक्याचा मराठीत ढोबळ मानाने पुढीलप्रमाणे अनुवाद करता येईल – 'इंग्लंडची अशी अपेक्षा आहे की, प्रत्येक व्यक्ती आपले (राष्ट्र) कर्तव्य बजावेल.' ह्या लढाई दरम्यान नेल्सन शत्रूच्या हमल्यामुळे/माऱ्यामुळे गंभीररित्या जखमी झाला व मृत्यूपूर्वी त्याने पुढील उद्‌गार काढले असे इतिहासकार म्हणतात – 'Thank God I have done my duty'. नेल्सनने इंग्लंडच्या आरमाराला ट्रॅफलगारच्या लढाईत मिळवून दिलेल्या यशामुळे नव्हे विजयामुळे व ह्या लढाई दरम्यान त्याने देशासाठी प्राण गमावल्यामुळे तो इंग्लंडचा लोकप्रिय राष्ट्रीयपुत्र ठरला. ट्रॅफलगारच्या लढाई स्मृतीप्रित्यर्थ इंग्लंडची राजधानी लंडन येथे ट्रॅफलगार चौक (Trafalgar Square) उभारण्यात आला व तेथेच नेल्सनचा स्तंभ (Nelson's Column) देखील उभारण्यात आला. ह्या स्तंभाची उंची जवळ-जवळ १८ फूट म्हणजेच ५.५ मीटर एवढी असून हा स्तंभ डार्टमूर (Dartmoor) येथील ग्रॅनाईट पासून बनविलेला आहे. हे ठिकाण नैऋत्य इंग्लंडमधील डेव्हॉन (Devon) ह्या काऊंटीमध्ये आहे. सर ऑर्थर कॉनन डॉयल यांनी त्यांची शेरलॉक्स होम्स्ची 'द हाऊंड ऑफ द बास्करव्हिल' ही जी कथा लिहिली आहे त्यातील वर्णनं व ती कथा डार्टमूर ह्या भागातच घडत आहे असे दर्शविले आहे. नेल्सनचा संभ १८४४ साली बांधला गेला तर त्याच्या पायथ्याशी असलेल्या चार सिंहांच्या मूर्ती १८६७ साली पायथ्याशी (बनवून) ठेवण्यात आल्या व ट्रॅफलगारच्या लढाईत फ्रेंचांच्या व स्पॅनिश लोकांच्या ज्या कास्याच्या (Bronze) तोफा इंग्रजांनी हस्तगत केल्या त्या वितळवून ह्या सिंहाच्या मूर्ती (शिल्पं) बनविण्यात आल्या असे म्हटले जाते. तसेच ह्या स्तंभाच्या वरच्या टोकावर वालुकाश्मापासून – वाळूचा खडक (Sandstone) बनविलेला होरॅशिओ नेल्सनचा पुतळा उभारण्यात आला. आजही जगभरातील पर्यटकांचे लंडन मधील हा ट्रॅफलगार चौक व नेल्सनचा स्तंभ हे मोठे आकर्षण आहे. देश विदेशातील पर्यटक ह्या ऐतिहासिक वास्तु पाहण्यासाठी लंडनमध्ये येत असतात. येथे वाचकांना अजून एक महत्त्वाची माहिती द्यावीशी वाटते व ती म्हणजे अशी की, विद्या प्रसारक मंडळाचे (ठाणे) कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर दरवर्षी ठाण्यातील शाळकरी व महाविद्यालयील विद्यार्थ्यांची 'इंग्लंड अभ्यास सहल' आयोजित करत असतात. ह्या अभ्यास सहली दरम्यान विद्यार्थ्यांना जगप्रसिद्ध अशी ऑक्सफर्ड व केंब्रीज विद्यापीठे व इतर महत्त्वाची प्रेक्षणीय व प्रामुख्याने शैक्षणिक स्थळे दाखविली जातात. यात विशेषतः विविध ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये व भारतीय स्वातंत्र्य सैनिक त्याकाळात इंग्लंडमध्ये राहत असलेली घरे यांचादेखील समावेश होतो. ह्या अभ्यास सहली दरम्यान विद्यार्थ्यांना ट्रॅफलगार चौक व नेल्सन स्तंभ पाहण्याचा देखील योग अनेकदा आलेला आहे. डॉ. विजय बेडेकरांनी एकदा विद्या प्रसारक मंडळाच्या ठाण्यातील शिक्षण संकुलातील विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या पुतळ्याचे/शिल्पाचे सौंदर्यशास्त्र उलगडून सांगताना ट्रॅफलगार चौक व नेल्सन स्तंभाचे सुंदर वर्णन करून ह्या दोन पुतळ्यांची (नेल्सनचा स्तंभावरील पुतळा व डॉ. वा. ना. बेडेकरांचे शिल्प) व स्थळांची अतिशय सुंदर तुलना केली होती. तर इंग्लंडने ट्रॅफलगारच्या लढाईत

होरॅशिओ नेल्सनला गमावले व त्या राष्ट्रावर जणू शोककळाच कोसळली. इंग्लंडचा तत्कालीन राजा तृतीय जॉर्ज (George III) ह्याला देखील नेल्सनच्या निधनामुळे अश्रू आवरता आले नाहीत. इतिहासकार म्हणतात की, ही बातमी कळल्यावर इंग्लंडचा झालेला विजय विसरून तृतीय जॉर्जने अश्रूपूर्ण नयनांनी पुढील उद्‌गार काढले – 'We do not know whether we should mourn or rejoice. The Country has gained the most splendid and decisive Victory that has never graced the naval annals of England; but it has been dearly purchased.' नेल्सनचे दफन एका सच्च्या राष्ट्रीय नायकाप्रमाणे वा वीराप्रमाणे सरकारी इतमामात करण्यात आले. असो.

सप्टेंबर १८०५ मध्ये नेपोलियनने जर्मनीत आपले सैन्य घुसवले व उल्म (Ulm) ह्या ठिकाणी ऑस्ट्रीयन सैन्याचा धुव्वा उडवला. उल्म हे दक्षिण जर्मनीतील बॅडेन–वूर्टेमबर्ग (Baden-Wurttemberg) प्रांतातील शहर होय. तसेच झेकोस्लोव्हियातील ऑस्टरलिट्झ् (Austerlittz) येथे ऑस्ट्रीयन व रशियन सैन्याचा पराभव केला. ह्या पराभवा नंतर ऑस्ट्रीयाने फ्रान्ससोबत प्रेसबर्गचा तह (१८०५– Treaty of Presburg) केला व रशियन सैन्याने माघार घेतली. तसेच नेपोलियन व रशियाचा तत्कालीन झार (राजा) पहिला अलेक्झांडर (Alexander I) यांची पूर्व प्रशियातील टिलसिट -Tilsit (१९४६ नंतर हेच ठिकाण सोव्हेट्स्क (Sovetsk) म्हणून प्रसिद्ध आहे) येथे भेट होऊन आपासांत सामंजस्य प्रस्थापित झाले. परंतु १८०६ मध्ये पुन्हा एकदा प्रशिया व रशिया ह्या दोन युरोपियन देशांनी फ्रान्सविरुद्ध मोहिमेस नव्याने सुरुवात केली. मात्र, फ्रेंच सैन्याने प्रशियनांचा जेना (Jena – जर्मनीतील शहर) व ऑस्टरस्ड्रेट (Austerstedt - जर्मनीतील शहर) येथे पराभव केला. त्याचप्रमाणे नेपोलियनने १८०७ साली रशियनांचा फ्रिडलंड (Freidland), १९४६ नंतर ह्या ठिकाणाला प्रावडिन्स्क (Pravdinsk) असे म्हटले जाते. (हे ठिकाण सध्याच्या युरोपियन रशीयातील कालिनिनग्राड ओबलास्ट Kaliningrad Oblast ह्या प्रांतात आहे) येथे पराभव केला. नेपोलियनने १८०९ साली पुन्हा एकदा ऑस्ट्रीयन सैन्याचा ऑस्टीयाची राजधानी व्हिएन्ना (Vienna) नजीक वॉग्रम (Wagram) येथे पराभव केला. अशातऱ्हेने नेपोलियने १८०५ ते १८०९ ह्या चार वर्षांच्या काळात ऑस्ट्रिया, प्रशिया व रशिया यांच्या एकत्रित (संयुक्त) सैन्याचा तसेच आळीपाळीने पराभव केलेला निदर्शनास येते. नेपोलियनच्या ह्या विजयांमुळे तो किती शूर सैनिक व परिपक्व सेनापती होता याची प्रचीती येते. १८०६ साली नेपोलियनने शार्लमेनने (Charlemagne) ९ व्या शतकात स्थापन केलेले 'होली रोमन साम्राज्य' (Holy Roman Empire) विसर्जीत केले व सोळा जर्मन राज्यांना एकत्र करून 'कॉन्फिडरेशन ऑफ ऱ्हाईनचा संघ' (Confederation of Rhine) ह्या नवीन राज्याची स्थापना केली. हे राज्य १८०६ ते १८१३ ह्या कालावधीत अस्तित्वात होते.

नेपोलियनने ऱ्हाईनच्या संघाप्रमाणेच जर्मनी व इटलीमध्ये इतर अनेक छोट्या मोठ्या राज्यांची निर्मिती केली व त्या राज्यांचा प्रमुख म्हणून आपल्या जवळच्या व्यक्तींना व प्रामुख्याने नातेवाईकांना नियुक्त केले. त्याने आपला भाऊ जोसेफ याला नेपल्स्‌चा (Naples - दक्षिण इटली) राजा तर दुसरा एक भाऊ लुई याला हॉलंडचा राजा बनविले. त्याचप्रमाणे नेपोलियनने आपला अजून एक भाऊ जेरोम याला वेस्टफॅलियाचा (Westphalia - सध्याच्या वायव्य जर्मनीतील एक प्रांत) राजा म्हणून घोषीत केले. तसेच त्याने वरसॉवचा (Warsaw) मुलुख निर्माण करून तो फ्रान्सला जोडून घेतला. त्याने टस्कनीचा मुलुख (Tuscany - मध्य इटलीतील प्रदेश) आपली बहीण एलीसा (Elisa) हिला बहाल केला. आयलिरियन प्रदेश (Illyrian Province - सध्याचा क्रोएशिया,

कार्नियोला, स्लोव्हेनिया, गोरिझिया व ऑस्ट्रियाचा भाग) फ्रान्समध्ये सामील केला. १८१९ मध्ये तर नेपोलियने चक्क हॉलंड व जर्मनीसुद्धा फ्रान्समध्ये सामील करून टाकला व युरोपमधील एका विशाल अशा फ्रेंच साम्राज्याची ज्यास इंग्रजीत इतिहासकार First French Empire म्हणतात स्थापना केली. हे नेपोलियनचे साम्राज्य १८०९ ते १८१४ ह्या पाच वर्षांच्या काळात युरोपात अस्तित्वात होते.

नेपोलियनने ऑस्ट्रीया, प्रशिया व रशिया या देशांचा पराभव करून बऱ्याचशा युरोपियन खंडावर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. परंतु त्याला अजूनही इंग्लंडला हरविता आले नव्हते. त्यामुळे नेपोलियनने इंग्लंडला जेरीस आणण्यासाठी खंडीय प्रणालीचा वा महाहीपीय पद्धतीचा (Continental System) अवलंब केला. नेपोलियनला ठाऊक होते की, इंग्लंड हे एक बेट असल्यामुळे सर्व बाजूंनी पाण्याने वेढलेले आहे व इंग्लंडचा त्याच्या भूमीवर पराभव करावयाचा असल्यास समुद्र पार करून जाणे आवश्यक होते. मात्र, इंग्लंडचे आरमार (The Royal Navy) त्या काळातील सर्वश्रेष्ठ आरमार होते. त्यामुळे नेपोलियनला वा त्याच्या आरमाराला इंग्लंडच्या आरमाराचा पराभव करून इंग्लंडवर थेट हल्ला कधीच करता आला नाही. आपण अगोदर पाहिलेलेच आहे की, कशाप्रकारे होरॅशिओ वेल्सनच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश आरमाराने नाईलच्या लढाईत (१७९८) व ट्रॅफलगारच्या लढाईत फ्रेंच आरमाराचा पराभव केला होता. त्यामुळे नेपोलियनला फ्रान्सचा इंग्लंडवर हल्ला करण्याच्या मर्यादा लक्षात आल्या म्हणूनच त्याने इंग्लंडचा युरोप मधील (खंडीय) इतर देशांशी असलेला व्यापार नेस्तनाबूत करण्यासाठी खंडीय प्रणाली (Continental System) आखली. नेपोलियनने १८०६-०७ च्या मिलान (Milan - इटलीतील शहर) व बार्लिन (Berlin - जर्मनीची राजधानी) राजाज्ञा वा फर्मानांनुसार खंडीय प्रणालीची सुरुवात केली. त्याने ह्या खंडीय प्रणालीअंतर्गत असे फर्मान सोडले की, खंडीय वा मुख्य युरोपातील कुठलाही देश इंग्लंडकडून कुठल्याही वस्तूंची आयात करणार नाही म्हणजेच विकत घेणार नाही. त्याचप्रमाणे युरोपातील देशांनी इंग्लंडच्या मालवाहू जहाजांना आपल्या बंदरात येण्यापासून मज्जाव करावा व इंग्लंडसोबतचे आपले सर्व व्यापारी संबंध तोडून टाकावेत. अशातऱ्हेने आपल्या खंडीय प्रणाली ह्या धोरणाच्या माध्यमातून इंग्लंडच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर घाला आणून त्या देशाची आर्थिक स्थिती नेस्तनाबूत वा खिळखिळी करून नेपोलियन ह्या दुकानदारांच्या देशाला (Nation of Shopkeepers) धडा शिकवू इच्छित होता. येथे एक गोष्ट लक्षात घ्यायला पाहिजे की, नेपोलियनच्या ह्या युरोपियन देशांवर आणल्या जाणाऱ्या दबाव तंत्राला प्रत्युत्तर म्हणून इंग्लंडच्या 'प्रिव्हि काऊन्सिलने' (Privy Concil - इंग्लंडच्या सम्राटाला सल्ला देण्यासाठी असलेले सल्लागार मंडळ/परिषद. या मंडळात प्रामुख्याने अनुभवी राजकारणी व माजी मंत्र्यांचा समावेश वा प्रादुर्भाव असे) 'ऑर्डर्स ऑफ काऊन्सिल' (परिषदेच्या आज्ञा/फर्मान) काढल्या व इंग्लंडच्या आरमाराला ज्या युरोपियन देशांनी इंग्लंड सोबतचे व्यापारी संबंध तोडून टाकले आहेत वा नेपोलियनच्या दबावाखाली आपल्या बंदरांमध्ये ब्रिटिशांच्या मालवाहू जहाजांना येऊ देत नाहीयेत अशा देशांच्या बंदरामध्ये इतर देशांची जहाजे येणार नाहीत वा अशा देशांची जहाजे समुद्र मार्गाने इतर देशांमध्ये जाऊ शकणार नाहीत याची व्यवस्था करावयास सांगितले. अशातऱ्हेने आता नेपोलियन (फ्रान्स) व इंग्लंडमधील वर्चस्वासाठीचा कलगीतूरा चांगलाच रंगला व याचा शेवट नेपोलियनच्या पराभवानेच व त्याच्या कारकिर्दीचा अंत करूनच होणार होता. नेपोलियन येथे एक गोष्ट विसरत होता की, त्याचे साम्राज्य एवढे विशाल व युरोपच्या विविध देशांत पसरलेले होते की, त्याला खंडीय प्रणालीची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे

---

तुम्ही कितीही धर्मनिष्ठ झालात, तरी तुम्हाला चेहऱ्यावरच्या सुरकुत्या लपविता येणार नाहीत. - होरेस

अतिशय कठीण होते. तसेच फ्रेंच आरमार, ब्रिटिश आरमारापुढे फारच दुबळे होते व ही बाब वारंवार सिद्ध झालेली होती. त्याचप्रामणे ह्या पद्धतीमुळे वा प्रणालीमुळे इंग्लंडचे व्यापारी व आर्थिक नुकसान कमी, तर युरोपमधील इतर देशांचेच जास्त नुकसान होत होते. त्यामुळे हळूहळू युरोपमधील देशांनी नेपोलियनच्या विरुद्ध जाऊन खंडीय प्रणाली झिडकारण्यास सुरुवात केली. याची सुरुवात प्रथमतः इटलीने केली. त्यानंतर पोपने देखील (रोमन कॅथलिक ख्रिश्चनांचा धर्मगुरू) ह्या पद्धतीचा विरोध केला. तेव्हा नेपोलियनने न डगमगता पोपला अटक केली. मात्र, हळूहळू खंडीय प्रणालीचा युरोपीयन देशांनी याउघड उघडपणे विरोध करण्यास सुरुवात केली, नव्हे इंग्लंडशी व्यापार करण्यास सुरुवात केली व नेपोलियनच्या इंग्लंडविरोधी आखलेल्या ह्या धोरणाचा देखील खोळंबा झाला व काहीच हाशील झाले नाही. याउलट यामुळे नेपोलियनच्या प्रतिमेला धक्का लागून त्याचा युरोपियन देशांवरील वचक कमी झाला असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

नेपोलियनच्या कारकिर्दीचा आपण काळजीपूर्वक अभ्यास केल्यावर आपल्या असे लक्षात येते की, त्याने १८०८ सालापासून पोर्तुगाल व स्पेनच्या (आयबेरीयन - Iberian) द्वीपकल्पीय युद्धाला (Peninsular War) जी सुरुवात केली त्याचीच परिणती त्याच्या अंतिम पराभवामध्ये व पाडावामध्ये झाली. द्विपकल्पीय युद्धाचा पहिला टप्पा म्हणजे नेपोलियनने स्पेन ह्या देशाच्या मदतीने पोर्तुगाल (Portugal) ह्या युरोपिय देशावर केलेला हल्ला होय. नेपोलियनला वाटत होते की, स्पेन व पोर्तुगाल ही राष्ट्रे खंडीय प्रणालीच्या विरोधात जाऊन इंग्लंडसोबत व्यापारी संबंध ठेवत आहेत. त्यामुळे त्यांना धडा शिकविण्याच्या दृष्टीने नेपोलियनने ह्या राष्ट्रांवर हल्ले करण्यास सुरुवात केली होती व त्याची परिणती द्वीपकल्पीय युद्धात झाली असे म्हणणे वावगे ठरू नये. जेव्हा नेपोलियनच्या (फ्रेंच) सैन्याने पोर्तुगालवर हल्ला केला तेव्हा पोर्तुगालचे शाही कुटुंब दक्षिण अमेरिकेत (लॅटीन अमेरिका) असलेल्या त्यांच्या ब्राझील ह्या वसाहतीत आश्रयाला गेले. पोर्तुगालचे शाही कुटुंब (Royal Family) नेपोलियनचा पूर्णपणे पाडाव होईपर्यंत ब्राझीलमध्येच होते. अर्थात, त्यांना पोर्तुगाल मधून समुद्र मार्गाने (अटलांटिक महासागर पार करून) ब्राझीलमध्ये सुरक्षितपणे जाण्यासाठी ब्रिटिशांनी मदत केली होती.

स्पेनच्या बाबतची अजून महत्वाची बाब म्हणजे त्यावेळचा स्पेनचा राजा सातवा फर्डीनांड (Ferdinand VII) हा मूळचा बुरबाँ (Bourbon) घराण्यातील होता. ह्याच बुरबाँ घराण्याची सत्ता १७८९ ची फ्रेंच राज्यक्रांती होईपर्यंत फ्रान्समध्ये होती व सोळावा लुई ह्या राजघराण्यातील होता. १७८९ च्या क्रांतीमुळे फ्रान्समधील बुरबाँ राजघराण्याची सत्ता उलथवून टाकली गेली व नेपल्समधील बुरबाँ राजघराण्याची सत्ता नेपोलियनने संपुष्टात आणली. सातव्या फर्डिनांडला स्पेनच्या राजगादीवरून हटवून नेपोलियनने स्वतःचा भाऊ जोसेफ याला स्पेनचा राजा बनविले, तर आपला मेहुणा मुरात याला नेपल्सचा राजा घोषित केले. मुरात हा नेपोलियनची लहान बहीण कॅरोलिन बोनापार्ट हिचा पती होता.

नेपोलियनने स्पेनमध्ये केलेले हे उद्योग वा आक्रमण व त्या देशाच्या राजकीय व्यवहारात केलेला हस्तक्षेप स्पॅनिश जनतेला मुळीच रुचला नाही. स्पॅनिश जनता आपल्या देशाचे सार्वभौमत्व व नागरिकांचे व्यक्तिस्वातंत्र्य यावर निस्सीम श्रद्धा असणारी होती. त्यामुळे नेपोलियनने स्पेनवर केलेले आक्रमण व त्या देशावर प्रस्थापित केलेली फ्रेंच राज्ससत्ता त्यांना अजिबात रुचली नाही. इतिहासकार असे म्हणतात की, नेपोलियनने इटली व जर्मनीमध्ये जी युद्धे केली होती त्यात व स्पेनमधल्या युद्धात फार मोठा फरक होता व हा फरक असा की,

नेपोलियन इटलीमध्ये व जर्मनीमध्ये तेथील राजांसोबत व सैन्यासोबत लढत होता. परंतु त्याला स्पेनमध्ये तेथील जनतेशी लढावे लागत होते. कोणत्याही देशात जेव्हा जनता रस्त्यावर उतरते व एखाद्या राजसत्तेविरुद्ध लढा देते तेव्हा त्या राजसत्तेला वा राज्यकर्त्यांना फार काळ आपली सत्ता शाबूत ठेवता येत नाही. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास आपल्या भारतात देखील २०व्या शतकात जेव्हा सामान्य जनता मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य संग्रामात सामील होऊ लागली तेव्हा ब्रिटिशांना भारतातील आपली सत्ता गमवावी लागली व त्यांना १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य द्यावे लागले. असो. इंग्रजांनी आर्थर वेलस्ली (Arthur Wellesley) यास फ्रेंच सैन्याविरुद्ध स्पॅनिश व पोर्तुगिजांना संघटीत करण्यासाठी पाठविले. येथे वाचकांना एक माहिती द्याविशी वाटते की, हा आर्थर वेलस्ली नेपोलियन विरुद्धच्या ह्या युद्धापूर्वी भारतात देखील आला होता व त्याने भारतात अनेक लढाया लढल्या होत्या व त्याचा मोठा भाऊ रिचर्ड वेलस्ली हा १८ मे १७९८ ते ३० जुलै १८०५ ह्या कालावधीत भारताचा ब्रिटिश गव्हर्नर जनरल देखील होता. नंतरच्या काळात १८०९ साली रिचर्ड वेलस्लीला इंग्लंडचा स्पेनमधील राजदूत म्हणून देखील नियुक्त करण्यात आले होते. अजून एक महत्त्वाची बाब म्हणजे आर्थर वेलस्लीनेच वॉटरलूच्या लढाईत (Battle of Waterloo - १८ जून १८१५ ) नेपोलियन विरुद्ध ब्रिटिश सैन्याचे नेतृत्व केले होते. असो. स्पेनमधील हे खंडीय युद्ध १८०८ ते १८१४ अशी सहा वर्षे चालू होते व ह्या युद्धात नेपोलियनला नामुष्कीपूर्व पराभवाला सामोरे जावे लागले व त्याचा भाऊ जोसेफ ह्याला स्पेनची राजगादी वा राजपद सोडावे लागले. अगोदर नमूद केल्याप्रमाणे ह्या युद्धापासून नेपोलियनचा पाडाव होण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळेच नेपोलियनने ह्या द्विपकल्पीय युद्धाचा उल्लेख 'स्पॅनिश अल्सर' (Spanish Ulcer) असा केलेला होता. तसेच त्याने स्वतःच्या अंतिम पाडावास त्याची रशियावरील चढाई नव्हे तर हे स्पेनमधील युद्ध कारणीभूत म्हटले आहे. यासंबंधीचे त्याचे इंग्रजीत भाषांतरित केलेले पुढील उद्‌गार फारच बोलके ठरतात - "That unfortunate war (येथे नेपोलियनला स्पॅनिश युद्ध अभिप्रेत आहे) destroyed me; it divided my forces multiplied, my obligations, undermined my morale. All the circumstances of my disasters are bound up in that fatel khot."

**संदर्भ :**

वर्ल्ड सिव्हिलायझेशन्स् - खंड-२ : फिलीप ली राल्फ
देयर हिस्ट्री अँड देयर कल्चर व इतर
वर्ल्ड हिस्ट्री : बी. व्ही. राव
युरोप सिन्स नेपोलियन : डेव्हीड थॉम्पसन
फ्रेंच राज्यक्रांती : ज. द. जोगळेकर
फ्रेंच राज्यक्रांती : न. चिं. केळकर
रेव्होलूशनरी युरोप : जॉर्ज रुड
ज्ञात अज्ञात नेपोलियन : डॉ. शरद कोलारकर
नेपोलियन (चरित्र) : म. श्री. दिक्षित

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

●●●

दिशा
नियमित
वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

शिळ्या वचनांना शिळ्या माशांप्रमाणे दुर्गंधी येते. - सिसेरो

# ऑक्सफर्ड, केंब्रिज व लंडन: आंग्लभूमीचा रोमांचक प्रवासवृत्तांत

*विद्या प्रसारक मंडळातर्फे दर वर्षी मे महिन्यात ऑक्सफर्ड, केम्ब्रिज व लंडनचा अभ्यासदौरा आयोजित करण्यात येतो. यावर्षी दि १५ ते २५ मे रोजी या दौऱ्यात भाग घेतलेल्या प्रशांत धर्माधिकारी यांचे अनुभव चितारणारा हा लेख - संपादक*

काही माणसं आयुष्यात पूर्वसंचित असल्याशिवाय मिळत नाहीत. डॉ. विजय बेडेकर हा असा एक अवलिया माणूस. जे जे उन्नत, उदात्त व चांगलं त्याचा ध्यास डॉ. बेडेकरांनी घेतला आहे. विद्या प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या १५ मे ते २५ मे २०१८ दरम्यान झालेला अभ्यास दौरा हा एक उदात्ततेच्या शोधयात्रेचा महत्त्वाचा टप्पा. शैक्षणिक संस्था अभ्यासाच्या व संशोधनाच्या विचारपीठ व्हाव्या म्हणून जगभर फिरणारे डॉ. बेडेकर म्हणजे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व. त्यांच्या संपर्कात आल्यावर जगाकडे पाहण्याची एक दृष्टी मिळत जाते.

जैसे डोळा अंजन भेटे।<br>
मग दृष्टीशी फाटा फुटे।।

असं माउली म्हणाले आहेत. विद्यार्थ्यांना काहीतरी नवं देण्याची डॉ. बेडेकरांची तळमळ नेहमी जाणवत राहते.



या शैक्षणिक सहली निमित्त अनेक विद्यार्थी व अभ्यासक मित्रांशी संवाद झाला. तीन हजार ब्रिटिशांनी येऊन ३३ करोड भारतीयांना जवळपास दीडशे वर्षे लुटलं याचं नेमकं गमक काय हे या दौऱ्यात समजलं. अनुशासन, दस्तऐवजीकरण, समयसूचकता व व्यक्तीपेक्षा राष्ट्र महत्त्वाचं ही धारणा या काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेता येतील. पाच मिनिटं संसदेत उशिरा पोचल्यामुळे मंत्रिपदाचा राजीनामा फक्त इंग्लंड मध्येच होऊ शकतो.

या दौऱ्यात शालेय विद्यार्थ्यांच्या सोबत धमाल करण्याचा योग आला. पाच महाविद्यालयीन विद्यार्थी, पालक, वेळणेश्वरच्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चिंचोलकर व सौ. चिंचोलकर हे देखील सोबत होते. कुणाल, संजना, अनिशा, इनारा व इंद्रनील हे कॉलेजचे विद्यार्थी सोबत होते. ए. के. जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या १७ विद्यार्थिनी सोबत होत्या. संतोष मिर्लेकर व्यवस्थापकाच्या भूमिकेत तर डॉ. बेडेकर व डॉ. आगरकर यांनी या दौऱ्यात शैक्षणिक आयाम विकसित करण्यासाठी मुलांना प्रेरित केले. डॉ. आगरकर हे टाटा मूलभूत विज्ञान संशोधन संस्थेत दीर्घकाळ संशोधक होते व जगभर एक अभ्यासक म्हणून त्यांची भ्रमंती असते. विज्ञानाची परिभाषा सोप्या करून सांगण्यात त्यांचा हातखंडा आहे. या शैक्षणिक सहलीत डॉ. आगरकर Friend, Philosopher and Guide या भूमिकेत होते.

आमचा पहिला मुक्काम केम्ब्रिजच्या युथ हॉस्टेल मध्ये होता. युवकांनी घरातून व आपल्या देशातून बाहेर पडावं व आजूबाजूचे जग सताड उघड्या डोळ्यांनी पहायला हवं म्हणून जगभर ४००० वसतिगृह चालवणारी YHA युथ हॉस्टेल ही संस्था. केम्ब्रिजमध्ये 'हॉप ऑन हॉप ऑफ' नावाच्या बसेस सम्पूर्ण केम्ब्रिज मध्ये ठरावीक वेळात नियमित चालू असतात. या बस मधून आपण कुठल्याही स्थानी उतरू शकतो. इच्छित कॉलेज वा संग्रहालय पाहून झालं की पुढच्या बसने परत पुढच्या ठिकाणी जाता येतं. या बस मध्ये हेडफोन मिळतात, त्याद्वारे आपण गाडी ज्या ज्या कॉलेज व वास्तूसमोरून जाते त्याची ऑडिओ माहिती आपणास ऐकण्याची व्यवस्था केली आहे. केम्ब्रिज विद्यापीठ म्हणजे आपल्या विद्यापीठासारखं एकाच वास्तूत नसून ट्रिनिटी कॉलेज, किंग्स कॉलेज आदी अनेक स्वायत्त कॉलेजांचा समूह म्हणजे केम्ब्रिज विद्यापीठ होय. कँम नदीवर ब्रिज बांधल्यामुळे याला केम्ब्रिज नाव प्राप्त झाले. इथल्या विद्यापीठांना आपल्यासारखे उठसूट महापुरुषांची नावं देण्याची परंपरा नाही. केम्ब्रिज विद्यापीठापासून रेल्वे स्टेशन दूर आहे. विद्यापीठ स्थापना करतेवेळी तत्कालीन विद्यापीठाच्या अधिसभेने असा प्रस्ताव मांडला की जर स्टेशन विद्यापीठाच्या जवळ बांधले तर विद्यार्थी सारखेच लंडनला जातील, अभ्यासात व्यत्यय येईल म्हणून दूर बांधले. असो. अशा अनेक छोट्या छोट्या रोचक गोष्टी आपणास केम्ब्रिजचा फेरफटका मारताना कळतात.

आम्ही केम्ब्रिज मधील अमेरिकन सीमेट्रीमध्ये गेलो. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेतील अनेक सैनिकांना वीरगती मिळाली. त्या सर्व सैनिकांना अमेरिकेत विमानाने नेणे शक्य नसल्याने अमेरिकेने इंग्लंडला केम्ब्रिज येथे दफनभूमीसाठी जागा मागितली. ती त्यांना मिळाली व एक खूप मोठे व विशाल सैनिक स्मारक अमेरिकेने केम्ब्रिज येथे बांधले. ही एक भेट देण्यायोग्य जागा आहे. ही जागा अमेरिकन सरकारची आहे, तिथे या सैनिकांना आदरांजली देणारी व माहिती देणारी ध्वनिचित्रफीत लावली असून तेथील अधिकाऱ्यांनी आम्हाला माहिती दिली. माहिती देताना तो अधिकारी भावुक झाला व त्याचा डोळ्यांच्या कडा पाणावलेल्या मी पहिल्या. युद्धानंतर अनेक वर्षांनी देखील त्याला त्याच्या मातीचे रक्षण करताना धारातीर्थी पडलेल्या सैनिकांची आठवण येते. आमच्याकडे मात्र या तोडीचं एकही स्मारक नाही. नाही चिरा, नाही पणती.

पुढे आम्ही सेजविक म्युझियम ऑफ जिओलॉजी पाहिले. हे भूगर्भ शास्त्रावरील अप्रतिम संग्रहालय आहे. हे केम्ब्रिज विद्यापीठाच्या भूगर्भ शास्त्र विभागाचे संग्रहालय असून त्याची देखभाल या विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी करतात. या संग्रहालयात चार्ल्स डार्विनच्या अनेक दुर्मिळ पत्र व वस्तूंचा संग्रह आहे. त्याच्या प्रसिद्ध बिगल या जहाजावरील समुद्र प्रवासात संग्रहित केलेल्या वस्तू व निरीक्षणे नीट जपून ठेवली आहेत. पृथ्वीच्या उत्पत्तीपासून कोणते जीव प्रगत झाले याचे खूप सुंदर प्रदर्शन आत आहे.



**किंग्स कॉलेज चॅपेल**

म्युझियम ऑफ अरकिऑलॉजी व अंथ्रोपोलॉजी, म्युझियम ऑफ झुलॉजी, व्हीपल म्युझियम ऑफ हिस्ट्री ऑफ सायन्स ही पण केम्ब्रिजचे भूषण आहे. डॉ. बेडेकरांनी किंग्स कॉलेज चॅपेल दाखवले. हे एक अवाढव्य चर्च असून स्थापत्यशास्त्रचा एक अजोड नमुना आहे. इथल्या प्रत्येक चर्च मध्ये त्या वास्तुबद्दलचा इतिहास


प्रदर्शनाच्या माध्यमातून खूप रोचकपणे लावलेला असतो व त्याला काही पौंड शुल्क असते.

किंग्स कॉलेजची स्थापना १४४१ साली राजा हेन्री चौथा याने केली. या चॅपेलच्या इतिहासाबद्दल एक स्वतंत्र लेख लिहिला येईल. तूर्तास या कॉलेजमध्ये भारतीय खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर शिकले एवढी माहिती पुरेशी आहे. एक गोष्ट मात्र नेहमी लक्षात येत राहते व ती म्हणजे या विद्यापीठांची सुरुवात एकतर चर्च मध्ये झाली व धर्मप्रसार करण्याचे ध्येय उरी बाळगून झाली. डॉ बेडेकर ज्या त्रिव्हिएम व कोड्रिव्हिएमचा उल्लेख करतात तो या शिक्षणाचा गाभा. (Trivium= Grammar, Rhetoric, Logic/Quadrivium= Arithmetic, geometry, astronomy, music) वरील ज्ञानशाखा या अभ्यासाच्या केंद्रस्थानी होत्या. भारतीय शास्त्र परंपरेत याला 'वेदांग' म्हणता येतील. शिक्षा, कल्प, छंद, व्याकरण, निरुक्त व ज्योतिष अशी ६ वेदांगे होत. प्रत्येक महाविद्यालयाचे ४ मुख्य भाग पडतात : वसतिगृह, भोजनगृह, ग्रंथालय व प्रार्थनास्थळ. सहसा मुलं निवासी असतात व गुरूच्या सोबत राहतात. भारतीय गुरुकुल पद्धतीशी साम्य जाणवले.



**ट्रीनिटी कॉलेज समोर**

ट्रिनिटी कॉलेज हे केम्ब्रिज विद्यापीठातील अत्यंत महत्त्वाचे ठिकाण. आयझॅक न्यूटन, लॉर्ड रुदरफोर्ड, फ्रान्सिस बेकन, लॉर्ड मेकॉले, श्रीनिवास रामानुजन तसेच इंग्रजी साहित्यातील जॉर्ज हरबर्ट, अँड्र्यू मार्व्हल, लॉर्ड टेनिसन, जॉन ड्रायडन, लॉर्ड बायरन इत्यादी महनीय कवी आणि महान व्यक्ती ट्रीनिटी कॉलेजमध्ये शिकल्या. तर प्रख्यात अर्थतज्ज्ञ व नोबेल विजेते अमर्त्य सेन इथे काही काळ प्राचार्य राहिले. एकट्या ट्रिनिटी कॉलेजने ३२ नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ इंग्लंडला दिले असून एका महाविद्यालयाने नोबेलसाठी दिलेला हा अमूल्य बहुमान आहे. भारतीय गणिती श्रीनिवास रामानुजन इथेच शिकले. डॉ. आगरकरांनी केम्ब्रिज विद्यापीठाची माहिती दिली. श्रीनिवास रामानुजन या थोर गणिताची हृदयंगम कथा डॉ. आगरकरांनी ट्रिनिटी कॉलेजच्या प्रवेशद्वारात सांगितली.




**ट्रिनिटी कॉलेज कवी टेनिसनचा पुतळा**

त्यांच्यावर आलेला The Man Who Knew Infinity हा चित्रपट ट्रिनिटी कॉलेज मध्येच चित्रित झाला. माझ्या २०१६ सालच्या लंडन दौऱ्यावर असताना कृष्णा शर्मा नावाच्या एका भारतीय विद्यार्थ्यांची ओळख झाली. तो ट्रिनिटी कॉलेजचा विद्यार्थी. याही वर्षी त्यांनी आमच्या विद्यार्थ्यांसोबत ट्रिनिटी कॉलेजच्या आतून फेरफटका मारला. आत हिरव्या कंच गवताने प्रफुल्लित झालेल्या विस्तीर्ण प्रांगणात फिरताना कृष्णा शर्मा म्हणाला की,

‘‘तुम्ही ज्या रस्त्यावरून चालत आहात त्यावरून न्यूटन आदी अनेक शास्त्रज्ञ एकेकाळी चालले आहेत.’’ माझ्यासह सर्व विद्यार्थ्यांना तो एक परमोच्च क्षण होता. ट्रिनिटी कॉलेजच्या चॅपेलमध्ये लॉर्ड टेनिसन या प्रख्यात इंग्रजी कवीचा खूप छान पुतळा आहे. तिथे मला एक इंग्रजीचा विद्यार्थी व शिक्षक म्हणून खूप छान वाटलं. या कॉलेजचा मागच्या भागात थेम्स नदी वाहते. इथे पंटींग करतात. पंटींग म्हणजे छोट्या शीड वजा जहाजात बसून पूर्ण केम्ब्रिजचा पाण्यातून मारलेला फेरफटका. हातात एक मोठा दांडा घेऊन हातांनी जहाज ढकलत नेणाऱ्यांना इकडे पंटर म्हणतात. आपल्याकडील पंटर जरा वेगळे. केम्ब्रिजमध्ये आम्ही फिट्झ विल्यम म्युझियमला भेट दिली. हे एक अप्रतिम संग्रहालय आहे. प्राचीन वस्तू, नाणे, चित्र व कला यांचा अजोड संग्रह येथे आहे. भारतीय विद्यापीठांनी वस्तुपाठ घ्यावा अशी ही वास्तू . केवळ परीक्षा घेणे व निकाल उशिरा लावण्यासाठी विद्यापीठ नसून ज्ञानशाखाच्या सर्व दृष्टीने विकास घडवण्यासाठी असतात. विद्यापीठाच्या प्रत्येक विभागाचे एक संग्रहालय आहे व त्याची जबाबदारी तेथील विद्यार्थी व प्राध्यापक आनंदाने सांभाळतात.

केम्ब्रिजच्या भेटीनंतर आम्ही ऑक्सफर्ड येथे दोन दिवस युथ हॉस्टेल मध्ये मुक्कामी होतो. डॉ. बेडेकरांनी ऑक्सफर्डचा कानाकोपरा अनेकदा पिंजून काढला असल्यामुळे व ते तेथील जवळपास सर्व ग्रंथालयाचे सभासद असल्याने आम्हा सर्वांना खूप विशेष वागणूक मिळाली. ऑक्सफर्ड येथील ब्रॉड स्ट्रीट वर आम्ही फेरफटका मारला. सर्व महत्त्वाची महाविद्यालये या रस्त्यावर आहेत. १२ व्या शतकात जिथे ऑक्सफर्ड विद्यापीठ सुरू झालं त्या युनिव्हर्सिटी चर्च मध्ये आम्ही गेलो. तिथे विल्यम जोन्स भारतीय पंडितांना शिकवतोय असे एक शिल्प आहे. यारून इंग्रजांच्या वसाहतवादी मानसिकतेचा प्रत्यय येतो. याच रस्त्यावर चालत जाताना डॉ बेडेकरांनी एक क्रॉस दाखवला. इथे १५५५–५६ साली थॉमस क्रमर, निकोलस रिडली व ह्युज लॅटिमर या तीन प्रोटेस्टंट ख्रिश्चन व्यक्तींना जीवन्त जाळण्यात आले होते. राणी मेरी हिने सम्पूर्ण इंग्लडला कॅथलिक ख्रिश्चन करण्याचा विडा उचलला होता; पण वरील तीन प्रोटेस्टंट व्यक्तींनी तिला विरोध केला म्हणून त्यांना जीवन्त जाळण्यात आले. नवल याचं वाटतं की इंग्रजांनी भारतात येऊन सभ्यता व संस्कृती भारतीयांना शिकवायचा प्रयत्न केला, जे भारतीय कमालीचे सहिष्णू होते. दैवदुर्विलास, दुसरे काय?

ऑल सोल कॉलेज, रेडक्लिफ केमेरा, शेलडोनियन थिएटर, बॉडलीयन लायब्ररी अशा अनेक वास्तू पाहात आम्ही इंडियन इन्स्टिट्यूट नावाच्या वास्तुसमोर उभे होतो. डॉ. बेडेकरांनी त्या वास्तूची इत्थंभूत माहिती दिली. मॉनेर विलीयम्स या थोर संस्कृत विद्वानाने ही वास्तू उभारण्यात मोलाचा वाटा उचलला. विशेष म्हणजे या वस्तूच्या प्रवेशद्वारी संस्कृतमध्ये लिहिलेला ताम्रपट आहे. तो असा



**मॉनेर विल्यम्स इंडियन इन्स्टिट्यूट ताम्रपट**

वरील संस्कृत श्लोक मॉनेर विल्यम्सने लिहिले असून प्राच्यशास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी व आंग्ल व आर्य भूमीची मैत्री वाढावी म्हणून ही वास्तू उभारत असल्याबद्दल लिहिलं आहे. राजा एडवर्ड अलबर्ट याने या वास्तूची कोनशिला ठेवली. भारतात आयसीएस

तत्त्वज्ञानात थोडे डोकावले की माणूस पाखंडी बनतो; पण त्यात गाढ अवगाहन केले की तो धर्मशील बनतो. – एफ. बेकॉन

म्हणजे सध्याच्या आयएएस अधिकारी व्हायच्या आधी इंग्रज अधिकारी इथे येऊन भारतीय संस्कृती आणि भाषा शिकत. एखाद्या देशाला केवळ सैन्य आक्रमण करून जिंकता येत नाही तर त्या देशातील धर्म, भाषा आणि संस्कृतीचा सांगोपांग अभ्यास करून वैचारिक गुलामगिरी करायला भाग पाडता येते हे ब्रिटिश सरकारने करून दाखवले.

नंतर आम्ही हिस्ट्री ऑफ सायन्स म्युझियम, पिट्स रिव्हर्स म्युझियम, अशमोलीयन म्युझियम पाहिलं. हा परत स्वतंत्र लेखाचा विषय होईल. १६२१ साली हेन्री डेनवरने औषधी वनस्पतींचा अभ्यास करण्यासाठी उभारलेल्या बोटॅनिकल गार्डनला आम्ही भेट दिली. जगभरातील जवळजवळ ६००० वनस्पती इथे आहेत. सुंदर फुलांपासून ते अनेक दुर्मिळ वनस्पती प्रजाती इथे काळजीपूर्वक वाढवल्या आहेत. दोन दिवसात खरंतर काहीच पाहून होत नाही. इथे एखादं वर्षभर तरी सम्पूर्ण पहायला लागेल अशी अवस्था होते.




**सावरकरांचे इंडिया हाऊस**

अभ्यास दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात आम्ही लंडनला मार्गस्थ झालो. मुंबईत फोर्ट परिसरात गेल्यास जसं वाटतं तसं लंडनमध्ये गेल्यास वाटतं. आमचा मुक्काम इंडियन वायएमसीए होस्टेलवर ४ दिवस होता. हे वसतिगृह लंडनच्या अगदी मध्यवर्ती भागात आहे. इथून आम्ही ट्युबस (लोकल ट्रेन) मधून प्रवास करत लंडनमधील महत्त्वाच्या वास्तू व संग्रहालये पहिली. लंडन मध्ये ब्रिटिश म्युझियम, ब्रिटिश लायब्ररी हे दोन मानबिंदू पाहिले. चार्ल्स डार्विन या थोर संशोधकाच्या घरी गेलो होतो. मानवाच्या उत्क्रांतीचे सिद्धांत मांडणाऱ्या डार्विनचे २२ एकराच्या विस्तीर्ण जागेतले घर ब्रिटिश सरकारने स्मारक म्हणून घोषित केले आहे. डार्विनच्या घरी असलेल्या प्रदर्शनात डार्विनच्या समुद्रसफरी बद्दल डॉ. आगरकर भरभरून बोलले.

जगाची प्रमाणवेळ ज्या ग्रीनिज मेरेडियन वरून ठरते तिथे जाऊन आलो. जगाला विभागणारी ग्रीनिज मिन लाईन इथून जाते. या रेषेवर उभा राहिल्यास एक पाय दक्षिण गोलार्धात तर दुसरा पाय उत्तर गोलार्धात ठेवता येतो. या रेषेवर जगभरातील मुख्य शहरांचे अचूक ठिकाण गणितीय परिभाषेत कोरले आहे. घड्याळाची निर्मिती कशी झाली व ग्रहांचे अचूक निरीक्षण करून वेळ मोजणारे जे घड्याळ आज आपण मनगटावर मिरवतो त्याचा रोचक प्रवास कसा झाला याचे एक सुंदर प्रदर्शन ग्रीनिजला आहे. इथेच नॅशनल मेरिटाईम म्युझियम आहे. डॉ. आगरकर आमच्यासोबत होते. ग्रीनिज वेधशाळेची इत्यंभूत माहिती डॉ. आगरकरांनी दिली.

दुसऱ्या दिवशी आम्ही ट्राफलगर चौकात गेलो जिथे नेल्सनचा मोठा पुतळा उभा केला आहे. नेल्सनने नेपोलियनला युद्धात हरवले व तो इंग्रजांचा राष्ट्रीय शौर्याचे प्रतीक बनला. नेल्सनचा पुतळ्याचे शिल्प असे बनवले आहे की त्याची दृष्टी ब्रिटिश पार्लमेंटवर राहील. त्याच परिसरात ब्रिटिश पार्लमेंट आहे. याच चौकात नेपियर व हॅवलोक या दोन ब्रिटिश जनरल्सचे अश्वारूढ पुतळे आहेत. एकाने भारताचा सिंध प्रांत काबीज केला तर एकाने लखनौ प्रांत. त्या पुतळ्यांच्या खाली लिहिलं आहे की, हे पुतळे लोकांनी पैसे जमा करून सर्वांच्या आर्थिक सहकार्यातून उभारले आहेत. सरकार इथे पुतळे बांधत नाही. ब्रिटिश देशप्रेमी व कडवे सैनिक आहेत हे या चौकात गेल्यावर कळते. या चौकातच मागच्या

बाजूला रॉयल आर्ट गॅलरी असून जगभरातील उत्तमोत्तम कला प्रदर्शन इथे भरते. इथे एका चौथऱ्यावर देशातील सर्वोत्तम कलाकृती लोकांच्या प्रदर्शनासाठी लावण्यात येते. जगभरातील कलाप्रेमींची ही पंढरी. टॉवर ऑफ लंडन, जेथे आपला कोहिनुर हिरा ठेवलाय, बकिंगहॅम पॅलेस जिथे राणी राहते व बिग बेन, ब्रिटिश पार्लमेंट, लंडन आय आदी ठिकाण आम्ही पहिली. यावेळी लंडनमध्ये एका आगळ्यावेगळ्या लग्नाची चर्चा सुरू होती. ती म्हणजे प्रसिद्ध हॉलिवूड नटी मेगन मार्कल व ब्रिटनचा राजकुमार यांच्या लग्नाची. आम्हाला निमंत्रण नव्हतं म्हणून तिकडे गेलो नाही. उगीच पंगती प्रपंच नको म्हटलं! लंडनला जाताय म्हणजे केवळ मजा मारायला वा हुंदडायला नसून शिकण्यासारख्या खूप गोष्टी इथे आहेत. रस्त्यावर असलेली शिस्त, नियम पाळणे व राष्ट्रीयता या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.

भारतीय क्रांतिकारकांनी इंग्लडच्या मातीत राहून देशाच्या स्वातंत्र्यासाठी काम केलं. त्यांच्या स्मृती ताज्या करण्यासाठी आम्ही त्यात्या ठिकाणी भेटी दिल्या. त्यात विलक्षण म्हणजे वीर सावरकर लंडनमध्ये ज्या इंडिया हाऊस मध्ये विद्यार्थी असताना राहत होते तिथे आम्ही गेलो. टिळक इंग्रज सरकारने त्यांच्यावर केलेल्या खटल्याला उत्तर द्यायला लंडनमध्ये ज्या वास्तूत राहिले, जिथे मदनलाल धिंग्रा यांनी करझन वाईलीला गोळ्या झाडल्या ती जागा. अशा अनेक....

या इंग्लंड दौऱ्यात रोजनिशी वाचन हा एक फार छान उपक्रम असतो. प्रत्येकाला रोजची डायरी लिहावी लागते व त्याचे सामूहिक वाचन होते. या वेळी मास मीडिया विभागाचे चार विद्यार्थी सोबत असल्याने सम्पूर्ण सहल डीएसेलार कॅमेरा व ट्रायपॉडच्या मदतीने रीतसर छायांकित झाली. लवकरच त्याची ध्वनिचित्रफीत बनवण्याचा मानस आहे.

आमची शैक्षणिक सहल २५ मे रोजी संपली. सर्व




**शेक्सपिअर जन्मस्थान**

विद्यार्थ्यांना हिथ्रो विमानतळावर सोडले. मी मात्र डॉ. बेडेकरांसोबत आठ दिवस अधिक राहिलो. शेक्सपिअरचे स्ट्रेटफर्ड अपॉन एव्हन व सेंट पॉल अशा स्थळांना भेटी दिल्या. हा स्वतंत्र लेखाचा विषय. एक गोष्ट जाणवत राहिली की संत तुकाराम, शेक्सपिअर व शिवाजी महाराज हे समकालीन. ज्या दिमाखात शेक्सपिअरचे स्मारक त्याच्या जन्मस्थानी मिरवते त्याच्या एक दशांशसुद्धा भारतात आपण तुकारामादी संतांची व त्यांच्या वाङ्मयाची किंमत करत नाही. शिवाजी महाराजांचे किल्ले सध्या ज्या अवस्थेत पडून आहेत ते पाहून दुःख होतं. इंग्लडच्या प्रत्येक नागरिकास त्याच्या परंपरेचा कडवा अभिमान आहे आणि आपण आजही प्रतिकांत गुंतलो आहोत. अभ्यास, संशोधन व सांस्कृतिक वारसा यात आपली परंपरा उज्ज्वल असली तरीही सध्याच्या घडीला आपण कोसो दूर आहोत.

२४ ते ३१ मे दरम्यान आमचा मुक्काम डॉ. मधुकर आंबेकर व डॉ. विदुला आंबेकर या पेशाने डॉक्टर दाम्पत्याकडे नॉर्थवूड येथे झाला. आंबेकर प्रभृती हे मागच्या ४० वर्षांपासून लंडन निवासी आहेत. आपली संस्कृती जपून ठेवून इंग्लंडमध्ये काम करणारी डॉ. आंबेकर व सौ. आंबेकर सारखी दाम्पत्य दुर्मिळच. त्यांच्या घरी अस्सल मराठी पदार्थ वरण, फळे, उपमा, पुरणपोळी इ. चोखंदळपणे आस्वाद करता आली. इथल्या भारतीय

(पृष्ठ क्र.३४ वर)

स्वतःच्या अज्ञानाची नम्र कबुली हाच तत्त्वज्ञानाचा परिपाक होय. - आर. डी. हिचकॉक

# इंग्लंडच्या शैक्षणिक सहलीतील माझे अनुभव

*मे २०१८ मध्ये विद्या प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या इंग्लंड सहलीत सहभागी झालेल्या एका पालकाने आपले अनुभव या लेखात विशद केले आहेत - संपादक*

जानेवारी २०१६ मध्ये केलेली एकमेव दुबई टूर वगळता मी आजपर्यंत परदेशवारी केलेली नव्हती आणि अचानक मला थेट इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली ती माझी मुलगी तनयामुळे.

तनया विद्या प्रसारक मंडळ संचालित सौ. ए. के. जोशी स्कूलमध्ये दहावीचे शिक्षण घेत आहे. व्ही. पी. एम्. गेल्या १२/१३ वर्षांपासून अतिशय स्तुत्य उपक्रम राबवित आहे. शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अधिक उज्ज्वल व्हावे ह्यासाठी जर त्यांना तशाच पोषक वातावरणात घेऊन गेले तर त्यांचा दृष्टीकोन अधिक व्यापक व विशाल होतो. केवळ हाच ध्यास मनात बाळगून आदरणीय डॉ. बेडेकर व डॉ. आगरकर सर प्रत्येक वर्षी मे महिन्यात इंग्लंड सहलीच्या माध्यमातून मुलांची नियोजनबद्ध शैक्षणिक सफर घडवून आणतात.

विद्यार्थ्यांसोबत पालकांना देखील येण्याची परवानगी असल्यामुळे मला पुनःश्च विद्यार्थी दशा अनुभवयास मिळाली. शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी, पालक, शिक्षकवृंद असा २५ जणांचा आमचा समूह लंडनच्या दिशेने १५ मे २०१८ रोजी रवाना झाला.

इंग्लंडमधील केंब्रिज आणि ऑक्सफर्ड ही शहरे जणू शैक्षणिक क्षेत्रातील पंढरीच होय! थोर भारतीय गणिततज्ज्ञ रामानुजन ह्यांनी ज्या कॉलेजमध्ये आपले शिक्षण पूर्ण केले. त्या ट्रिनीटी कॉलेजबद्दल आम्हाला अधिक माहिती प्राप्त झाली ती तेथे उच्च शिक्षण घेत असलेल्या कृष्णा शर्मा ह्या विद्यार्थ्याकडून.

दुसऱ्या महायुद्धात धारातिर्थी पडलेल्या अमेरिकन सैनिकांच्या स्मरणार्थ उभारलेल्या अमेरिकन सिमेट्रीची जबाबदारी संपूर्णतया अमेरिकन नागरिकांकडून पार पाडली जाते. ते देखील इंग्लंडमध्ये हे बघून अचंबा वाटला. शेवटी 'बळी तो कान पिळी' हेच खरे.



**अमेरिकन सिमेट्री**

विविध महाविद्यालये, लायब्ररीज, म्युझियम्स जागतिक स्तरावरील धर्म, धर्मग्रंथांविषयीची माहिती आइन्स्टाईन ह्याच्या हस्ताक्षरातील जतन करून ठेवलेला फलक हे सर्व बघून जणू ज्ञानरुपी सागरात पोहत असल्याचाच भास झाला.



**ब्रिटिश म्युझियम्स**

संपूर्ण जगाला उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताची देणगी देणाऱ्या सर चार्ल्स डार्विन ह्यांच्या घराला स्मारकाचा

---

तत्त्वज्ञ बना; पण त्या सर्व जंजाळात आपण 'मानव' आहोत हे मात्र विसरू नका. - डेव्हिड ह्यूम

दर्जा देऊन ब्रिटिश सरकारने त्यांच्या कार्याचा यथोचित गौरवच केला आहे.

फ्रान्सचा सर्वेसर्वा जगज्जेता नेपोलियन ह्यास युद्धात हरविण्याच्या कामी महत्त्वाचे योगदान देणाऱ्या ब्रिटिश सेनापती नेल्सनच्या पुतळ्याला सर्वाधिक उंचीवर स्थान देऊन त्याच्या कार्याची महती सिद्ध केली आहे.

तेथील ट्रॅफिक सेन्सचे तर खरंच अनुकरण करण्यासारखेच आहे. वाहन चालकाला देखील सक्तीची विश्रांती घेण्याचा नियम बघून आपल्याकडील वाहनचालकांची स्थिती आठवली. स्वयंशिस्त हाच सगळ्या समस्यांवर रामबाण उपाय ठरू शकतो असे वाटले.



**ऑक्सफर्ड येथील बोटॅनिकल गार्डन**

केंब्रिज, ऑक्सफर्ड तसेच लंडन येथे भारताविषयीची मिळालेली माहिती ऐकून भारतीय असल्याचा अभिमान निःसंशय दुणावला. ऑक्सफर्ड येथील इंडियन इन्स्टिट्यूट (Indian Institute) मध्ये ताम्रपटलावर लिहिलेला संस्कृत श्लोक ब्रिटिशांचे परकीय भाषेवरील प्रेम तसेच ज्ञानलालसा दर्शवितो.

सेंट मेरी व्हर्जिन चर्चमध्ये छताला बसवलेली राष्ट्रपिता महात्मा गांधीची चित्ररुपी फरशी, येरवडा तुरुंगातून गांधीजींनी तत्कालीन व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विन ह्यांना लिहिलेले पत्र, माजी ब्रिटिश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल ह्यांच्या पुतळ्याशेजारी महात्मा गांधी ह्यांच्या पुतळ्याला दिलेले स्थान बघून माझ्या मनात बापुजीं विषयीचा आदर अधिक उंचावला. कुठलेही शस्त्र हाती न घेता केवळ अहिंसा व सत्याग्रह ह्या दोन बहुमोल जादूई अस्त्रांनी महासत्तेला देखील कसा छेद दिला जातो ह्याचे उदाहरणच ह्या थोर पुरुषाने जगासमोर ठेवले.

थोर क्रांतीकारक मदनलाल धिंग्रा, जहाल मतवादी लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या जपून ठेवलेल्या स्मृती म्हणजे ब्रिटिशांनी त्यांच्याविषयी व्यक्त केलेला आदरच होय.

मदनलाल धिंग्रा ह्यांनी कर्झन वायलीवर गोळ्या झाडल्यात. त्यांचे शिकण्याचे महाविद्यालय बघून क्षणभर त्या जागेवरच नतमस्तक व्हावेसे वाटले. परिणामांचा विचार न करता भारतमातेच्या अशा अनेक सुपुत्रांनी बलिदान केल्यामुळे आपण आज स्वातंत्र्याची फळे चाखतो आहोत.

इंग्रजांनी अटक केल्यानंतर देखील स्वराज्याच्या ध्येयाने झपाटलेल्या सावरकरांनी खोल समुद्रात उडी मारताना त्यांच्या मनाची काय अवस्था असेल हे आम्हा सर्वसामान्यांच्या कल्पनेपलीकडचे आहे आणि ह्यातूनच 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' ह्यासारख्या अजरामर गीताचा जन्म झाला.

परदेशात राहून देखील मायभूमीची ओढ जपणाऱ्या भारतीयांना भेटण्याचा आम्हास योग आला.

केंब्रिज निवासी श्री. व सौ. सुदेश सांग्रे ह्यांनी आमच्या सोबत झालेल्या सुसंवादाची सुरुवातच 'भारत माता की जय' ह्या वाक्याने करून आम्हाला आश्यर्चचकित

---

तत्त्वज्ञ हा सर्व आयुष्यभर मृत्यूला कसे सामोरे जावे याची तयारी करत असतो. - प्लेटो

केले. स्वतःच्या मुलींची राधा, तुलसी, गंगा असे नामकरण करून मायभूमीशी किती घट्ट नाळ जोडलेली आहे हे दाखवून दिले.

कित्येक वर्षांपासून लंडनमध्येच स्थायिक असून देखील स्वदेशावर हरतऱ्हेने प्रेम करता येते, हे श्री. आंबेकर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. आंबेकर ह्यांच्याशी झालेल्या चर्चेतून समजले.

शेवटच्या दिवशी केलेल्या लंडन आयच्या सफारीने सहलीची सांगता अतिशय आनंददायी झाली. संपूर्ण लंडन शहराला उंचावरून बघतांना अतिशय सुरेख वाटले.

ह्या संपूर्ण टूरमध्ये जाणवलेल्या काही गोष्टींचा मला प्रकर्षाने उल्लेख करावासा वाटतो.

विद्यार्थ्यांसोबत राहून त्यांना अगदी छोट्या छोट्या गोष्टींची माहिती करून देण्याविषयी सतत धडपड करणाऱ्या डॉ. बेडेकर व डॉ. आगरकर ह्या बहुआयामी व्यक्तिंविषयी काय लिहावे? वेगवेगळ्या विषयांमधील त्यांचे ज्ञान बघून आश्चर्य वाटते. जीवनाच्या विविध कलागुणांना, छटांना सहजरीत्या त्यांनी स्वतःमध्ये सामावून घेतले आहे. इतरांना देखील ज्ञानार्जन करण्याची त्यांची तळमळ बघून त्यांच्याविषयी आदर वाटल्यावाचून राहत नाही. मुलांनी केवळ परीक्षार्थी न राहता विद्यार्थी म्हणून त्यांचा सर्वांगिण विकास कसा होईल ह्या विषयीचे त्यांचे विचार खरेच वाखाणण्यासारखे आहेत.

रोजच्या निरीक्षणातून विद्यार्थ्यांना विचारण्यात येणारे प्रश्न, डायरी लिखाण व वाचन ह्यामुळे विद्यार्थ्यांची वैचारिक पातळी उंचावण्यास नक्कीच मदत झाली.

प्राचार्य श्री. चिंचोलकर व सौ. चिंचोलकर मॅडम, श्री. प्रशांत धर्माधिकारी सर, श्री. संतोष मिर्लेकर आदी सरांच्या मार्गदर्शन व सहयोगामुळे टूर अधिक सुकर होण्यास मदत झाली.

महाविद्यालयीन चमू व शालेय विद्यार्थ्यांसोबत दहा दिवस व्यतीत करतांना मला स्वतःला शालेय जीवन नव्याने जगावयास मिळाले यातला आनंद काही औरच!

ही टूर म्हणजे आम्हा सर्वांसाठी ऊर्जादायी, भविष्यासाठी प्रेरणादायक, वैचारिक, ज्ञानाची समृद्धता वाढवणारी ठरली ह्यात तिळमात्र शंका नाही

**– सौ. दीपाली सुनील वाणी**
ठाणे

•••

(पृष्ठ क्र. ३१ वरुन ... **ऑक्सफर्ड, केंब्रिज व लंडन: आंग्लभूमीचा रोमांचक प्रवासवृत्तांत**)

लोकांशी यांचं जिव्हाळ्याच नातं. त्यांनी माझे व डॉ. बेडेकरांची दोन व्याख्यान आयोजित केली. लंडनमध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी 'Western Scholars of Upanishads' या विषयावर बोलण्याचा योग आला. हा विषय डॉ. बेडेकरांनी मला सुचवला होता. व्याख्यानं चांगली झाली. डॉ. बेडेकर 'Manipulation of Indian Education in 19th Century' या विषयावर बोलले. डॉ. बेडेकरांनी व्याख्याना संदर्भात केलेल्या सूचना खूप फलद्रुप झाल्या. अभ्यासास वेगळे विषय मिळत गेले व माउलींनी म्हटल्याप्रमाणे 'जे चालते ज्ञानाचे बिंब' अशी प्रचीती येत गेली. शेवटी आपल्या संवेदनांचा परीघ अधिकाधिक व्यापक बनवणे म्हणजेच माणूस म्हणून मोठं होणे.

तुकोबा म्हणालेच आहेत की :

संकोचोनी काय झालासी लहान।
घेई आपोषण ब्रह्मांडाचे।।

अनुभवांनी खूप समृद्ध होता आलं ..

**– प्रा. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी – ९४२२४९५०९४

# येऊ दे तुफान । येऊ दे तुफान । शहरांत आतां । पाण्यासाठी ।।

एके काळी होता । चेंदणी तो भाग । जुना गावठाण । ठाणे गांव ।।१।।
इथे होते वाडे । अशा रचनेचे । मागे ती विहीर । पुढे घर ।।२।।
दोन मजली ती । टुमदार घरं । वाडा संस्कृतीची । होती गल्ली ।।३।।
पुढे मोठे घर । वाड्यात विहीर । रहाट गाडगं । विहिरीला ।।४।।
बाकी ती मोकळी । जागा झाडांसाठी । नाना प्रकारची ।। झाडे होती ।।५।।
एकूण वाड्याची । जमीन पाहिली । साठ टक्के जागा । मोकळी ती ।।६।।
मग अशा जागी । पाणी मुरायचे । झरे वाहायचे । विहिरीत ।।७।।
पाऊस पडतां । तुडुंब विहीर । भरून जायची । ओसंडून ।।८।।
झाडे होती खूप । त्यांना मिळे पाणी । न्हाणी घराचे ते । सोडले जे ।।९।।
जमिनीत पाणी । असे मुरायचे । झाडांना पाणी ते । पुरायचे ।।१०।।
कोणे एके काळी । चेंदणी भागांत । पाणी मुरायचे । पावसाचे ।।११।।
नव्हतेच तेव्हा । पाणी ते नळाला । आंघोळी सर्वांच्या । विहिरीत ।।१२।।
पिण्यायोग्य होते । विहिरीचे पाणी । होता तो उपसा । विहिरीला ।।१३।।
वाडा दिसे छान । हिरवागार तो । नैसर्गिक थंड । हवा होती ।।१४।।
मग दिवाळीत । सणाच्या दिवशी । थंडी हा मौसम । वाटायचा ।।१५।।
आता ती थंडी । नाही जाणवत । पळून ती गेली । कायमची ।।१६।।
उन्हाच्या त्या झळा । इतक्या नव्हत्या । मुरायचे पाणी । मुबलक ।।१७।।
म्हणून रे बाबा । पूर्ण वर्षभर । थोडे थंड वाटे । जुन्या काळी ।।१८।।
भासली नव्हती । गरज पंख्यांची । वातानुकूलन । यंत्रांचीही ।।१९।।
वाडे ते पाडले । चाळी हो पाडल्या । नवीन बांधल्या । इमारती ।।२०।।
वाडा संस्कृतीचा । नाश तो रे झाला । अध्याय संपला । एक मोठा ।।२१।।
काळाच्या उदरी । गडप तो झाला । वाड्यांचा तो काळ । भूतकाळ ।।२२।।
शेताड जमीन । खूप होती इथे । जुन्या ठाण्यामध्ये । जुन्या काळी ।।२३।।
वन जमिनीची । वाताहत झाली । वृक्ष तोड झाली । खूप खूप ।।२४।।
गावठाण गांव । शहर बनले । शहर वाढले । चहूंदिशे ।।२५।।
फार थोडी आहे । जमीन उघडी । हातावर मोजा । मैदाने ती ।।२६।।
फार थोड्या बागा । आहेत हो छोट्या । कुठे मुरणार । पाणी आता ।।२७।।
रस्ता रुंदीकरण । शहरांत झाले । रस्तेही बांधले । सिमेंटचे ।।२८।।
भूमी बंद केली । सिमेंट लावूनी । पाणी ते वाहते । गटारांत ।।२९।।
पाणी थेट जाते । मोठ्या गटारांत । तिथून ते जाते । खाडीमधे ।।३०।।
भूमी तहानली । कोरडी पडली । थंडावा तो गेला । जमिनीचा ।।३१।।
झरे ते वाळले । विहिरी आटल्या । कोरड्या पडल्या । शहरांत ।।३२।।
कूपनलिका त्या । गृह संकुलांत । अनेक खोदल्या । पाण्यासाठी ।।३३।।
लागे वीज खूप । पंप ते चालती । पाणी ते आटले । जमिनीचे ।।३४।।

पुष्कळ लोक तत्त्वज्ञानासारखे बोलतात, पण मूर्खांसारखे वागतात. - एच. जी. बॉन

निसर्गाची टाकी । पाण्याची रिकामी । कोण भरेल ती । जाणावे बा ।।३५।।
उपाय तो आहे । पाणी भरा आता । निसर्गाची टाकी । पुन्हा भरा ।।३६।।
जितके घेतले । तितके भरावे । उपसा करावा । तितकाच ।।३७।।
भावी पिढीचे ते । आत्ताच घेतले । पाणी ते आत्ताच । उपसलें ।।३८।।
पुन्हा पाणी भरा । एक तो कोपरा । मोकळा असावा । पाण्यासाठी ।।३९।।
गृहसंकुलात । पावसाचे पाणी । मुरविणे आहे । जमिनीत ।।४०।।
छपराचे पाणी । जाते वाहून ते । गटारात वाया । जाऊ नये ।।४१।।
पावसाचे पाणी । गोड ते निर्मळ । वाया गेले पहा । किती वर्षं ।।४२।।
गोड पाणी जाते । खाडीत मिळते । सांडपाणी होते । खारट ते ।।४३।।
खाडीत मिळते । पावसाचे पाणी । आधीच जिरवा । जरुरी ते ।।४४।।
आधीच मुरवा । पाणी जमिनीत । करावी व्यवस्था । त्वरेने ती ।।४५।।
करावा तो खड्डा । एक कोपऱ्यात । टाकावे दगड । तयामधे ।।४६।।
छपराचे एक । पन्हळ जोडावे । खड्ड्यात सोडावे । पाणी आता ।।४७।।
हजारो लिटर । पाणी ते मिळेल । शहरी भागात । आरामात ।।४८।।
क्षारता पाण्याची । कमी ती होईल । पाणी मुरवितां । पावसाचे ।।४९।।
गोड पाणी तुम्हा । पुन्हा ते मिळेल । नकोच ती चिंता । पाण्यासाठी ।।५०।।
सर्व शहरांत । गृह संकुलांत । पाणी मुरवावे । पावसाचे ।।५१।।
पाणी जिरवावे । स्वावलंबी व्हावे । नको रडगाणे । उन्हाळ्यात ।।५२।।
वाढली ती संख्या । गृहसंकुलांची । पाण्याचा तो प्रश्न । सोडवावा ।।५३।।
भविष्यात धरण । फुटले जर ते । किती तो उडेल । हाहाःकार ।।५४।।
त्याचीच योजना । आत्ताच करावी । पाणी साठवा ते । जमिनीत ।।५५।।
नको आता प्रश्न । हिय्या तो करावा । निश्चय धरावा । पाण्यासाठी ।।५६।।
पाणी हे जीवन । जाण रे माणसा । होत का नाही रे । कारवाई ।।५७।।
पाणी मुरविणे । सामाजिक देणे । ऋण ते फेडणे । निर्सगाचे ।।५८।।
होईल जीवन । सुखी समाधानी । पाणी मुरवा ते । जमिनीत ।।५९।।
पर्यावरणाची । साखळी जोडणे । तेच रे कल्याण । मानवाचे ।।६०।।
आता खेडेगावी । 'तुफान आलया' । मोहीम चालली । जोरदार ।।६१।।
पण इथेसुद्धा । गरज आहे ती । शहरांत पाणी । मुरवावे ।।६२।।
पावसाचे पाणी । शहरीं मुरविता । वाचेल ते पाणी । धरणाचे ।।६३।।
हजारो लिटर । मुबलक पाणी । बचत पाण्याची । धरणांत ।।६४।।
उरेल जे पाणी । गावाला मिळेल । एकमेका सहाय्य । होईल हो ।।६५।।
वळवा ते पाणी । जिथे आहे शेती । मुबलक धान्य । पीकवा ते ।।६६।।
शेतीला पाणी ते । मिळेल असे हो । प्राधान्य ते द्यावे । योजनेला ।।६७।।
पाणी मिळता ते । सुखाने नांदेल । बळीराजा त्याच्या । घरामधे ।।६८।।
गृहसंकुलात । जमिनीत आता । मुरेल ते पाणी । खूप खूप ।।६९।।
आपणही आता । शहरांत सुद्धा । तुफान आलंया । म्हणू या रे ।।७०।।
येऊ दे तुफान । येऊ दे तुफान । शहरांत आता । पाण्यासाठी ।।७१।।

**– सुरेश पित्रे**
चेंदणी,
ठाणे (पश्चिम)

---

दातदुखी शांतपणे सहन करणारा तत्त्वज्ञ मला अजून आढळलेला नाही. – शेक्सपीअर

# परिसर वार्ता

**- संकलित**

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### महाविद्यालय विकास समिती

३१ मार्च २०१८ रोजी महाविद्यालय विकास समितीची पहिली बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीचे अध्यक्षपद वि. प्र. मंडळाचे माननीय कार्याध्यक्ष डॉ. विजय वा. बेडेकर यांनी भुषविले.

### वार्षिक दिवस

७ एप्रिल रोजी वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम होता. श्री. जे. एन. कयाल वि. प्र. मंडळाचे सहसचिव यांनी मुख्य अतिथी म्हणून संमती दिली. निवृत्त जिल्हा न्यायधीश श्री. दिलीप जोशी हे सन्माननीय अतिथी होते. शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा पुरस्कारांचे वाटप झाले.

### प्रात्यक्षिक प्रशिक्षण

एल. एल. बी. तीन वर्षासाठी २०१७-१८ ला प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि परीक्षा पूर्ण केल्या आणि अंतिम तीनही निकाल ७ एप्रिल २०१८ रोजी जाहीर केले.

### कायदेशीर जागरुकता कार्यक्रम

महाविद्यालयाच्या विधी सहाय्य केंद्राच्या अंतर्गत पंचायत समिती शहापूर येथे दिनांक ११ एप्रिल २०१८ रोजी विधी साक्षरता अभियानाचे आयोजन केले होते. यावेळी कायद्याच्या विविध विषयांवर पथनाट्यांच्या माध्यमातून सादरीकरण करण्यात आले होते. ग्राहक संरक्षण, स्त्रीभ्रुण हत्या, पोलिस अत्याचारापासूनचे संरक्षण, शिक्षणाचा अधिकार, माहितीचा अधिकार, घरगुती हिंसाचार अशा विविध विषयांवर सादरीकरण झाले. प्रा. विनोद वाघ, प्रा. हेतल मिस्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १६ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

दिनांक २७ मार्च २०१८ रोजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वि. प्र. मं. स्वरांजली हा कार्यक्रम ज्ञानद्वीपच्या प्रांगणात सादर केला. कु. ऐश्वर्या गोखले - तृतीय वर्ष विधी व शिरीष बापट - द्वितीय वर्ष विधी यांनी अनेक मधुर गाणी शास्त्रीय पद्धतीने सादर केली. यावेळेस हार्मोनियम व तबल्याचा माध्यमातून श्री. वाघमारे व श्री. सावंत यांनी साथ दिली. सदर कार्यक्रम हा अभिनव गुप्त या प्रांगणातील खुल्या मंचावर सादर करण्यात आला. सायंकाळी ५.३० वाजता हा कार्यक्रम सादर करण्यात आला. सुमारे दीड तास सर्व सदर गाण्यांचा आस्वाद घेत होते. सदर गाणी ही मराठी व हिंदी भाषेतली होती. यावेळेस विद्यार्थ्यांनी गीतासह, वेगवेगळे राग यांच्याविषयी ही माहिती दिली. सदर अनुभव हा फारच अविस्मरणीय  व रमणीय असा होता.

**प्रास्तविक परीक्षा एप्रिल २०१८ - प्रथम वर्ष विधी**

| दिनांक | विषय | प्राध्यापक |
|---|---|---|
| १६.०४.२०१८ | गुन्ह्यांचे कायदे / भारतीय दंड संहिता | ॲड. आय. ए. शेख / ॲड. अरुण गायकवाड |
| १७.०४.२०१८ | कुटुंब कायदे - I | प्राध्यापक हेतल मॅडम / प्राध्यापक दातार |
| १८.०४.२०१८ | पर्यावरण विषयक कायदा | प्राध्यापक मनिषा वाघ / डॉ. राजश्री गांधी |
| १९.०४.२०१८ | घटनात्मक / संविधान कायदा | प्राध्यापक विनोद वाघ |

प्रार्थना म्हणणाऱ्या लोकांपेक्षा मदत करणारे लोकच जास्त पवित्र. - इंगरसोल

### द्वितीय वर्ष विधी

| दिनांक | विषय | प्राध्यापक |
|---|---|---|
| १६.०४.२०१८ | न्यायशास्त्राचे कायदे | डॉ. मिथुन बनसोडे |
| १७.०४.२०१८ | जमीन कायदा | ॲड. सुरेश पायक |
| १८.०४.२०१८ | कंत्राटाचे कायदे | डॉ. मिथुन बनसोडे |
| १९.०४.२०१८ | फौजदारी कायदा | ॲड. अंबर जोशी |
| १९.०४.२०१८ | कर आकारणी कायदा | ॲड. सुकराम बिसेन |
| १९.०४.२०१८ | दिवाळखोरी कायदा | प्राध्यापक श्रीमती श्रीविद्या जयाकुमार |

### तृतीय वर्ष विधी

| दिनांक | विषय | प्राध्यापक |
|---|---|---|
| १६.०४.२०१८ | पर्यायी विवाद उपाय योजना कायदा | ॲड. सुरेश पायक |
| १७.०४.२०१८ | पुराव्याचे कायदा | ॲड. आय. ए. शेख / ॲड. रूपाली |
| १८.०४.२०१८ | बँकींग कायदा | ॲड. सुकराम बिसेन |
| १९.०४.२०१८ | बौद्धिक संपत्ती कायदा | डॉ. राजश्री गांधी |
| १९.०४.२०१८ | महिला आणि मुलांशी संबधित कायदा | श्री. रुद्रजीत नाग |
| २०.०४.२०१८ | विमा कायदा | ॲड. रुपाली |
| २१.०४.२०१८ | कायदा आणि चिकित्सा कायदा | डॉ. महेश बर्वे |

### विशेष अतिरिक्त व्याख्याने (वेळ : ५ ते ८)

| दिनांक | विषय | प्राध्यापक |
|---|---|---|
| २०.०४.२०१८ | संविधान कायदा : मुलभूत अधिकार | ॲड. अरुण जलिसातगी / प्राध्यापक श्रीमती श्रीविद्या जयाकुमार |
| २१.०४.२०१८ | संविधान कायदा : मुलभूत अधिकार | ॲड. अरुण जलिसातगी / प्राध्यापक श्रीमती श्रीविद्या जयाकुमार |
| २४.०४.२०१८ | भारतीय दंड संहिता | प्राध्यापक श्रीमती श्रीविद्या जयाकुमार |
| २४.०४.२०१८ | भारतीय दंड संहिता | ॲड. मनोज भट्ट |

### मराठी व्याख्याने (वेळ : ६ ते ८)

| दिनांक | विषय | प्राध्यापक |
|---|---|---|
| २०.०४.२०१८ | भारतीय दंड संहिता | ॲड. अरुण गायकवाड |
| २१.०४.२०१८ | भारतीय दंड संहिता | ॲड. अरुण गायकवाड |
| २३.०४.२०१८ | पर्यावरण विषयक कायदा | ॲड. अरुण गायकवाड |
| २४.०४.२०१८ | पर्यावरण विषयक कायदा | ॲड. अरुण गायकवाड |
| २७.०४.२०१८ | संविधान कायदा : मुलभूत अधिकार | प्राध्यापक विनोद वाघ |
| २८.०४.२०१८ | संविधान कायदा : मुलभूत अधिकार | प्राध्यापक विनोद वाघ |

जे सत्कृत्य करायचे असेल ते लांबणीवर टाकू नका. - अल्वर्टानो ऑफ ब्रेसिया

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय)**

व्यवस्थांचे जे पाश्चिमात्यिकरण होते.

वास्तविक इंग्रज हे १००% परकीय होते. ईस्ट इंडिया कंपनी ही एक व्यापारी कंपनी. १७५७ सालच्या प्लासीच्या लढाईपासून १८१८ ला पेशवाई खालसा होण्यापर्यंत, आणि उत्तरेतील शिखांच्या लढाईपासून दक्षिणेतील टिपूच्या लढाईपर्यंत सर्व लढाया आपण हरलो. लढाईमध्ये फक्त शौर्यच पुरेसं नसतं तर भेदनीती, व्यूहरचना आणि मुत्सद्देगिरी याही तेवढ्याच महत्त्वाच्या बाबी असतात. १८३५ साली सगळा नसला तरी बहुसंख्य भारत इंग्रजी अंमलाखाली आला होता. उरले सुरले संस्थानिक हे इंग्रजांचे अंकीत होते. १८०० सालापासून पुढे ३०-४० वर्षे इंग्रज जो व्यवस्थेमधील बदल करत होते त्याला साहजिकच प्रतिकार देखील होत होता. त्याचीच परिणती आपण १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धात पाहिली. ईस्ट इंडिया कंपनी जेव्हा हे युद्ध जिंकली तेव्हा मात्र ब्रिटिश सरकार खडबडून जागे झाले आणि भारताची सत्ता खऱ्या अर्थाने राणीच्या ताब्यात गेली. राणीचा ताबा ही एक तांत्रिक बाब होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या अंमलाखाली काय किंवा राणीच्या आधिपत्याखाली काय, भारतामध्ये सत्ता राबवणारे इंग्रजच होते.

इंग्रज हे लढाया जिंकत असले तरी तलवारीच्या जोरावर राज्य फार काळ टिकत नाही याची त्यांना पुरती जाण होती. इंग्रजांप्रमाणेच १६ व्या शतकानंतर पोर्तुगीज, फ्रेंच, डच या सगळ्यांचाच वसाहतवाद चालू झाला. १५ व्या शतकात युरोपात आलेल्या प्रबोधनयुगाचा फायदा हे सगळेच देश उठवत होते. तरी इंग्रजांनी याचा जो फायदा घेतला तेवढा इतर देश घेऊ शकले नाहीत. कोलंबस, जेम्स कुक किंवा वास्को द गामा यांनी जगामधल्या युरोप व्यतिरिक्त भारताप्रमाणेच ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड, अमेरिका खंड यांचा शोध तर लावलाच आणि तेथे वसाहतीही केल्या. अर्थातच यातल्या बहुसंख्य भू-भागावर इंग्रजांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या. याकरता मेकॉलेसारख्या अनेक मुत्सद्दी अधिकाऱ्यांची त्यांना मदत झाली.

मेकॉले जरी आपल्या दृष्टीने खलनायक असला तरी तो अत्यंत हुशार, मुत्सद्दी व दूरदृष्टीचा होता.

भारतामध्ये आला तेव्हा त्याचे वय फक्त ३४ वर्षे होते. भारतामध्ये तो फक्त ४ वर्षे राहिला. तरीही त्यांनी व्यवस्थेमधले दोन महत्त्वाचे बदल घडवून आणले. शिक्षणाप्रमाणेच, न्यायव्यवस्थेचा कणा असलेल्या 'इंडियन पीनल कोड'चाही तो जनक आहे. या गोष्टींची रचना, आखणी आणि अंमलबजावणी हा रक्ताचा एक थेंबही न सांडता इंग्रजांनी घडवून आणला. इंग्रजांनी भारतावर राज्य केले ते इंग्रजांपेक्षा भारतीय नोकरशहांच्या मदतीने. इंग्रजीसैन्यामध्येही भारतीय लोकच लढत होते. मेकॉलेची दूरदृष्टी आणि मुत्सद्देगिरी ही त्याच्या खालील प्रसिद्ध वचनामध्ये दिसून येते.

"We must do our best to form a class who may be interpreters between us and the millions whom we govern, a class of persons Indian in blood and colour, but English in taste, in opinions, morals and intellect."

''हाडामासांनी भारतीय; पण आचार, विचार आणि संस्कृतीनी पाश्चिमात्य.''

पाच हजार वर्षांची परंपरा असलेल्या, आणि सामाजिक व्यवस्थेपासून सर्व क्षेत्रात वेगळं तत्त्वज्ञान असलेल्या भारतीयांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्याची ही दूरदृष्टी, आणि त्याकरता लागणाऱ्या आयुधांची निर्मिती ही साधी गोष्ट नव्हती. मेकॉलेला त्यांनी इंग्रजी भाषेचं माध्यम आणलं म्हणून दोष दिला जातो. पण नुसतं माध्यम एवढा बदल घडवू शकत

देशबांधवांच्या कल्याणासाठी जी माणसे झटतात, ती ईश्वर सदृश होतात. - सिसेरो

नाही. इस्लामी आक्रमक आले. त्यांनीही जुलूम जबरदस्ती केली, धर्म परिवर्तन केले, पण मेकॉलेने हे काहीच न करता, फक्त शिक्षणाच्या माध्यमातून भारतीय आचार-विचारांचे पाश्चिमात्यीकरण करून 'सांस्कृतिक वसाहतवादां'ची मुहूर्तमेढ रोवली.

मेकॉलेला इतिहासाची चांगली जाण होती. मेकॉलेनी "The History of England from the Accession of James the Second" हे ब्रिटिशांच्या इतिहासावरील पुस्तक लिहिलं आहे. तो इतिहासाच्या अभ्यासाप्रमाणेच निबंधकार, संसदपटू, वादविवाद कुशल आणि कवीही होता. "Lays of Ancient Rome" हा कवितासंग्रहही त्याने लिहिला आहे. 'एडिंबरो रिव्ह्यू' या प्रथितयश नियतकालिकामध्ये जॉन मिल्टन या इंग्रजी कवीवरील त्याचा ४२ पानांचा लेख हा इंग्रजी साहित्याचा उत्कृष्ट नमुना धरला जातो.

कुठल्याही यंत्रणेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशासकीय अधिकारी लागतात. वास्तविक याची खरी जाण आणि गरज ही कौटिल्यानी २००० वर्षांपूर्वीच लिहून ठेवली होती. पण असे कुशल अधिकारी घडवण्याची संपूर्ण यंत्रणा जगात प्रथम ब्रिटिशांनी इंडियन सिव्हील सर्व्हिस (ICS) या व्यवस्थेतून निर्माण केली. तरुण, हुशार, तडफदार इंग्रजांची याकरता निवड होऊ लागली. नुसतेच प्रशासकीय नाही, तर ज्यांच्यावरती राज्य करायचं त्यांची भाषा, संस्कृती आणि समाजसंस्था यांचा अभ्यासही या अधिकाऱ्यांना करावा लागे.

ही व्यवस्था निर्माण करण्याचाही मेकॉले हा एक जनक आहे.

आजही आपल्या संस्कृतीचा आपण जेवढा वस्तुनिष्ठ अभ्यास करू शकत नाही तेवढा या तरुण, तडफदार अशा विशेष प्रशिक्षित अधिकाऱ्यांनी केला. ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी भ्रष्ट होते, पण हे तरुण अधिकारी एका वेगळ्या इर्षेने प्रेरित केल्यामुळे भ्रष्टाचार तर सोडाच, पण प्रचंड कार्यकुशलतेने ते काम करत होते. मूठभर इंग्रज आपल्यावर १५० वर्ष राज्य का करू शकले याचे उत्तर याच्यात आहे.

आजचे आपले प्रशासकीय अधिकारी ही याचीच नक्कल आहे, पण तीही आपण नीट करू शकलो नाही. 'आरक्षण' आणि 'भ्रष्टाचारां'नी त्या व्यवस्थेचेही आपण बारा वाजवले आहेत. स्वकीयच या व्यवस्थेचे शत्रू झाले आहेत.

मेकॉले हा जेवढा मुत्सद्दी होता तेवढेच त्याचे निरीक्षणही प्रचंड होते. ईस्ट इंडिया कम्पनीचे येणारे अनेक अधिकारी हे भ्रष्ट आहेत हे त्याला माहित होते. रॉबर्ट क्लाइव्ह व वॉरन हेस्टिंग यांनी केलेल्या प्रचंड भ्रष्टाचाराकरिता ब्रिटिश पार्लमेंटमध्ये चर्चा झाल्या. भारत अक्षरशः लुटून नेण्यामध्ये या अधिकाऱ्यांचा मोठा वाटा होता. दुर्दैवानी भारतातले राजेरजवाडे, जमीनदार हेही आपल्या स्वार्थाकरता अशा लोकांना बक्षिसी म्हणून पैसे, हिरे, माणके देत होते. कोहिनूर, आणि पिट्स डायमंड ही त्याचीच उदाहरणे आहेत. 'नबाब' हा शब्द इंग्रजी कोशामध्ये यामुळेच प्रविष्ट झाला. सहाजिकच भारतातील सुबत्ता, आणि भारतीयांची सहज मिळणारी गुलामगिरी यामुळे अनेक ब्रिटिश अधिकारी भारतात येणेच नाही, तर राहणेही पसंत करत होते. मेकॉलेच्या निरीक्षणातून हे कसे सुटेल?

ते लिहितात...

"It is natural that they should not have it, for they are sent out while still schoolboys, and when they know little of the world. The moment of emigration is to them also the moment of emancipation; and the pleasures of liberty and affluence to a great degree compensate them for the loss of their home. In a few years they become Orientalized, and by the time that

जो मानवाशी सचोटीने वागतो, तो ईश्वराशीदेखील प्रामाणिकपणे वागतो. - जे. आर. लोवेल

they are my age, they would generally prefer India, as a residence, to England. A lad who six months before... could indulge in few pleasures for want of money... finds himself able to feast on snipes and drink as much champagne as he likes, to entertain guests, to buy horses, to keep a mistress or two, to maintain fifteen or twenty servants who bow to the ground every time they meet him, and suffer him to kick and abuse them to his heart's content."

दुर्दैवानी स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षांनंतरही शिक्षण प्रणालीत बदल तर सोडाच, पण त्या काळासारखे राजकीय नबाब मात्र आज गावोगाव निर्माण झालेले आपण बघतो आहोत.

भारतीय परंपरागत शिक्षण पद्धती ही राजाश्रयाप्रमाणेच लोकाश्रयावरही चाले. गुरू हा कोणाचाही मिंधा नसे. ज्ञानप्रसार या एकाच कार्याला तो बांधलेला होता. मेकॉलेच्या पद्धतीचे सर्वात मोठे योगदान (?) म्हणजे सरकार देऊ लागलेले अनुदान व शिष्यवृत्ती. मेकॉलेचे हे योगदान ७० वर्षांनंतरही भारतातील प्रत्येक सरकारांनी वाढवतच नेले. एवढेच नाही तर 'शिक्षणाच्या अधिकारां'खाली त्याची नाळ 'जातीशी'ही जोडली. तोंडी 'मंत्र' जाती निर्मूलनाचा, कृती मात्र जाती 'दृढ' करण्याची. यातच आता भर पडली आहे ती 'पगडीची'! पूर्वी व्यक्तीमुळे पगडी मोठी व्हायची. आता, 'घाला विशिष्ट पगडी आणि व्हा मोठे' हा संदेश आपल्याला मिळाला.

हाडामांसाचे भारतीय, पण आचारविचारांनी पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करण्यात अभिमान बाळगाणारा शिक्षित समाज, स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांनी या व्यवस्थेतून आपण निर्माण केला. केसापासून वेषापर्यंत पाश्चिमात्यांचे अनुकरण म्हणजेच आधुनिकता आणि प्रगती हे फसवे समिकरण आपण स्वच्छेने स्विकारले.पाश्चिमात्यांची संशोधनवृत्ती, स्वच्छता, निटनेटकेपण, कायद्याचा आदर या गोष्टी सोडून संदर्भहीन स्वैराचार, लिंगपिसाटपणा आणि आत्मकेंद्रित व्यवस्था आपण स्विकारली. याउलट योग असो, संस्कृत भाषा असो, तत्त्वज्ञान असो, किंवा आयुर्वेद असो याचे वस्तुनिष्ठ, तटस्थ संशोधन आणि अनेकवेळा डोळस स्वीकार पाश्चिमात्य करतांना आपण बघतो.

मेकॉलेच्या यशाचे खरे वर्णन हे आनंद कुमारस्वामींनी १९०८ साली जे केले, इतके चांगले मूल्यमापन पुढे होणे कठीण आहे.

"Speak to the ordinary graduate of an Indian University, or a student from ceylon of the ideals of the Mahabharata, he will hasten to display his knowledge of shakespeare, talk to him of religions philosophy-you find that he is an atheist of the crude type common in Europe a generaton ago, and that not only has he no religion, but is lacking in philosophy as the average Englishman, talk to him of Indian music, he will produce a gramophone or harmonium and inflict upon you one or both; talk to him of Indian dress or jewellery - he will tell you that they are uncivilized and barbaric, talk to him of Indian art - it is news to him that such a thing exists, ask him to translate for you a letter written in his own mothertongue he does not know it. He is indeed a stranger in his own land"

(Modern Review, Calcultta, Vol. 04. Oct. 1908, P. 338)

आज मेकॉले १००% यशस्वी झाला आहे.

मेकॉलेला 'खलनायक' करणे सोपे आहे, पण त्याच्या सारखा दूरदृष्टीचा 'नायक' होणे कठीण आहे.

आज खरी गरज आहे ती 'भारतीय मेकॉले'ची.

**डॉ. विजय बेडेकर**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.